"मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
ों ज़िल्हा वाचनालय ) वाचनालय/नौपाडा.



किंमत ६ आणे.

अनु - १५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम.................... दि: ..८।६....
क्रमांक ....६३२.... नों. दि. २५।६।७०

॥ श्रीगुरुदत्त प्रसन्न ॥

संगीत.

# चंद्रकांत-वसुंधरा.

अथवा,

# अल्लाउद्दीन नाटक.

हें पुस्तक,

बाळकृष्ण विठ्ठल धामणस्कर

यांनीं रचिलें.

तें

सावळाराम विठ्ठल धामणस्कर

यांनीं मुंबईंत

" गणपत कृष्णाजी " छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति २ री.

हें पुस्तक " बाळकृष्ण लक्ष्मण पाठक " मोतीबाजार मुंबई पोष्ट मार्केट, यांच्याकडे विकत मिळेल.

किंमत ६ आणे.

# प्रस्तावना.

मन हें फार उत्सवप्रिय आहे, त्याला नित्य कांहींना-कांहीं नवें पाहिजे. कारण सर्व दिवसभर उद्योगधंदा करून श्रमित झालेल्या मनुष्यांच्या मनास आनंद होण्याकरितां नानातऱ्हेचे खेळ, सत्काव्य, वाचन, गायन, नृत्य वगैरे पुष्कळ प्रकार आहेत. परंतु त्या सर्वांत उत्तम नाटकासारखा मनोरंजक विषय दुसरा कोणताच नाहीं, एकतर नृत्य, गायन, शृंगार, वीर, करुणादि हास्यरसभरित भाषण व दुसरें नीतिपर ज्ञान, असे दोन फायदे होऊन विश्रांतीची विश्रांती. या कलेनें सुनीतिचा बोध जसा मनावर ठसतो तसा दुसऱ्या कोणत्याही उपायानें ठसत नाहीं. नाटक ह्मणजे मानवी संसाराचें चित्र आहे. यांत अनीतीनें वागलें असतां आपला शेवटीं अंत कसा होतो हें स्पष्ट दाखविलें असतें.

हल्लीं पारशी, उर्दु, गुजराथी चालीच्या रचनेची आमच्या रसिक जनांला गोडी लागली आहे. करितां मी हा प्रस्तुतचा ग्रंथ उर्दु अल्लाउद्दीन नाटकाच्या आधारें लिहिला आहे. तथापि त्याचें अक्षरशः भाषांतर न करितां, अर्थ न जाऊं देतां कांहीं ठिकाणीं कंटाळवाणा भाग होता तो संक्षेपानें गाळला आहे व कित्येक ठिकाणीं वाढविला आहे.

या पुस्तकांत माझ्या अल्पबुद्धीनें दोषही बरेच असतील त्याबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी फार फार आशा आहे. आतां जगच्चालक जो अनंतकोटि ब्रह्मांडनायक त्याची अनन्यभावें प्रार्थना करून हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

ग्रंथकर्ता,

बाळकृष्ण विठ्ठल धामणस्कर.

# पात्रें.

सूत्रधार ............................ नाटकाचार्य.

नटी ............................ त्याची स्त्री

शूरसेन ............................ राजा.

चंद्रकांत ............................ नायक.

वक्रतुंड ............................ प्रधानपुत्र.

जादुगार ............................ चंद्रकांताचा शत्रु.

हिराजी ............................ जमादार.

शामभट ............................ जोशी.

दुर्मती राणी ............................ शू. स्त्री.

वसुंधरा ............................ नायिका.

गिरजा ............................ ज० स्त्री.

भागीरथी ............................ चंद्र० आई.

चतुरिका ............................ दासी.

याशिवाय भुतें, वेताळ, मुका, पऱ्या, राक्षस, शिपाई वगैरे

---

या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा व रंगभूमीवर प्रयोग करण्याचा वगैरे सर्व हक्क पुस्तक प्रसिद्धकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

---

७१ ३५ ३

श्रीदत्तप्रसन्न.

संगीत

# चंद्रकांत--वसुंधरा

अथवा

# अल्लाउद्दीन नाटक.

अंक १ ला.

## मंगलाचरण.

पद. ( पंचतुंड नररुंड० ) ही चाल.

कुसुमांजली ही अर्पण करितों श्रीदत्ता हे तव चरणीं॥
सभारंगणीं गणपतिसह ये तोषविं सकलां सदयपणीं॥
चार वेद तव सेवक सेवी कामधेनु पद दिनरजनीं ॥
अनुसूयेंत प्रेमानंदें नमुनी वदसी निज जननी ॥
तिन्ही लोकिं तूं सदा नांदसी सदयपणें भक्तोद्धरणीं॥
शम दम साधन न कळे यास्तव विठ्ठलसुत विनवी
नमुनी ॥ कुसुमांजली० ॥ १ ॥

सर्वपात्रें—( पडदा उघडल्याबरोबर गाऊं लगतात. )

कमलारमण हरी ॥ होवो सुजनां सुखकारी ॥धृ० ॥
कांता कनक अती ॥ जगांतरीं पाशचि ते असती॥
त्यांतुनि सकलां सोडवुनी ॥ हा भवसागर पार करीं॥
कमला० ॥ संतसमागम नित्य घडो ॥ विषयीं प्रीति

कधीं न जडो ॥ पापमती ही सकळ दडो ॥ बलवत्क-
विवरी प्रेम धरीं ॥ कमला० ॥ १ ॥

( सूत्रधार पुढें होतांच पडदा पडतो. )

सूत्र०—(पुढें होऊन) प्रेमपूर्वक भगवत्स्मरण इतकें झालें तरी पुरे आहे. (प्रेक्षकांस उद्देशून) माझ्या निमंत्रणावरून जमलेले महाजन हो;

साकी.

मंदमती मी त्याचपरी तीं पात्रें अज्ञचि असती ॥
यास्तव मत्कृति मान्य करुनि द्या हीच तुह्मांला
विनती ॥ करितों मी समयीं ॥ द्यावें यश मज या
कार्यीं ॥ १ ॥

बरें, माझ्या प्रियेला मीं पाचारण केलेलें असून ती अद्याप कां बरें आली नाहीं? (पडद्याकडे पाहून) प्रिये अद्याप तुझें नेपथ्यांतील काम आटपलें नाहीं काय ?

नटी—( गात प्रवेश करते )

पद. ( गुले गुलजार ) ही चाल.

हो मी आलें ॥ कार्य आपुलें तें ॥ कोणतें कथा त्वरें
मातें ॥ हो मी आलें ॥ धृ० ॥ अर्धांगी मी आपुली
असतां ॥ नाथा कां तुह्मी चिंतेनें ॥ व्यापित
दिसतां ॥ कारण याचें नकळे हो मज आज ॥
ह्मणुनी महाराज ॥ कथुनी सत्वर तें ॥ तुह्मी करा
शांत चित्तातें ॥ १ ॥

सूत्र—( तिच्या गळ्यांत हात घालून ) आर्ये, माझ्या निमंत्रणावरून हे सर्व महाजन नाटक पाहण्याच्या उत्स-

कतेनें या सभामंडपांत जमले आहेत. तर प्रथम तूं कांहीं-तरी थोडें गायन करून यांचीं मनें रममाण कर.

**नटी**–नाथा, कोणत्या विषयावर गायन करूं बरें?

**सूत्र०**–प्रिये दुसरा विषय कशाला पाहिजे?

पद—( सांगुं मी किती कठोर० ) ही चाल.

**नाम प्रभुचें नित उच्चारी ॥ नाम० ॥ धृ० ॥ पूर्ण सनातन चालक जगिं या ॥ भक्तजनांचा जो कैवारी ॥ भक्त० ॥ चित्सुख धामीं निर्गुणरूपी ॥ मग्न असे जो सदा मुरारी ॥ मग्न० ॥**

**नटी**–आर्या—

पद—( या दीन युवतीला० ) ही चाल.

**हा तरुनि जावया भवसागर बहु थोर ॥ बहु थोर ॥धृ०॥ सुपथ एक मज दिसतो जगतीं ॥ क्रोधादिक या षड्रिपुहातीं ॥ मुळिं न राहतां त्या भगवंतीं ॥ लक्ष ठेवितां होइल हा भवपार ॥ भवपार ॥ सदा स्थीरता मनीं असावी ॥ सुख न गणीं या क्षणैक देहीं ॥ भूतदया ती ठेवुनी हृदयीं ॥ वागे तो नर होइल कीं भवपार ॥ भवपार ॥ १ ॥**

**सूत्र०**–बरें पण आर्ये, आतां या सुंदर मंडपांत जमले-ल्या, नाट्यप्रिय प्रेक्षकांच्या मनाला रंजविण्यासारखें असें कोणत्या प्रकारचें नाटक करून दाखवावें?

**नटी**–मला हो काय विचारायचें यांत? थोडीं का आ-हेत आपल्याजवळ. एखादें नवीन तऱ्हेचें असेल तें दाखवावें.

**सूत्र०**–ठीक आहे "चंद्रकांत–वसुंधरा" अथवा "अल्ला-उद्दीन" या नांवाचें नाटक माझ्या एका मित्रानें नवीन

त-हेवर रचून तें मला दिलें आहे. तर त्याचाच प्रयोग आज करून दाखवावा अशी माझी इच्छा आहे.

( पडद्यांत ) पद.—( भूपति खरे ते वैभव० ) ही चाल.

श्रीजगदंबा कुळस्वामिणिनें वर दिधला ॥ ह्मणुनि यां कन्यका सगुणि जाहली मजला ॥ बहु प्रेमें पाळुनि वसुंधरा हें तिजला ॥ मीं नाम ठेविलें लग्नसमयही आला ॥ चाल ॥ त्यामुळें लागली चिंता ॥ कितितरी ॥ यत्न मी करुनि थकलों ते ॥ बहुपरी॥ नृपकुमार पाहिले लोकीं ॥ कितितरी ॥ बहु तस्बीरा हि त्या नृपपुत्रांच्या तिजला ॥ दाखविल्या परि नच मान्य कुणिहि जाहला ॥ १ ॥

नटी-(ऐकून) आर्या, मुलीच्या लग्नासंबंधीं चिंता करणारा असा हा कोण असावा बरें?

सूत्र०-हा समजलों—

साकी.

या नगरीचा शूरसेन नृप वसुंधरा तत्कन्या ॥ निज इच्छेसम वरावांचुनी नवरी तो कधिं अन्या ॥ ह्मणुनी भूप मनीं ॥ वाहतो चिंता दिनरजनी ॥ १ ॥

(नटी व सूत्रधार जातात व राजा महालांत आसनावर बसला आहे असा पडदा उघडतो.)

शू०रा०-("श्रीजगदंबा कुळस्वामिणिनें०" हें पूर्वोक्त पद ह्मणून) काय करावें उपाय हरला (दुर्मती राणी प्रवेश करते)

दु०रा०-उपाय हरला असेंच ह्मणत स्वस्थ बसतां हें काय? गावांतील लोक चर्चा करूं लागले आहेत. तोंड देखील बाहेर काढूं देत नाहींत.

शू० रा०—ही तिची सावत्र आई असल्या कारणानें तिच्या सुखदुःखांकडे कशाला लक्ष देते. मला मात्र विचार केला पाहिजे. काय करूं कांहींच सुचत नाहीं.

पद.—( भव्य नदी वा जलधी० ) ही चाल.

चिंता करि बहुतचि ही व्याकुळ या मम तनुसीं ॥
दिनरजनीं चैन नसे कांहीं न सुचतें मजसीं ॥
राज्यकृत्य मुळीं न घडे वेड्यासम मन्मतिसीं ॥
झाला कीं भ्रम न कळे काय ह्मणावें यासी ॥ अ-
न्नोदक नच रुचतें शांति नसे चित्तासी ॥ जगदी-
शा हरिं चिंता मान्य करुनि विनतीसी ॥ १ ॥

दु० रा०—आतां तुह्मांला शेवटचें सांगणें सांगतें. त्या दांडग्या पोरीला आतांचे आतां या ठिकाणीं बोलावून प्र-धानपुत्र वक्रतुंडाबरोबर तुला लग्न केलेंच पाहिजे असें स्पष्ट सांगा.

शू० रा०—अग मीं तिला अनेक वेळां सांगितलें परंतु ती त्याचेंतर नांवच घेऊं देत नाहीं.

दु० रा०—पहातें कसें नांव घेऊं देत नाहीं तें (दासीस) कोण आहेरे तिकडे.

हुजऱ्या—(धांवत येऊन) जी बाईसाहेब मी आहें पिला-जी. काय अज्ञा आहे ?

दु० रा०—वसुंधरेला जाऊन असें सांग कीं, तुला आतां-चे आतां महाराजांनीं भेटीकरितां बोलवलें आहे.

हुज०—होय बाईसाहेब. (जातो)

वसुंधरा—( चतुरिका दासीसह प्रवेश करून )

पद—( चंद्रकांत राजाची कन्या० ) ही चाल.

काय असे त्या विधिनें लिहिलें मम दैवीं बाई ॥

सौख्य असे कीं दुःख कळेना करुं तरि गत काई ॥ तातानें मज बाहियलें हें ऐकुनियां होई ॥ मन्मन चंचल दुश्चिन्हचि हें भासे या समयीं ॥ १ ॥

( राजाजवळ जाऊन ) बाबा, आज इतक्या गडबडीनें बोलावण्याचें कारण तरी काय ?

शू० रा०—बाळे—

पद—( भूवरी या आशेचा० ) ही चाल.

मत्प्रिय दुहिते काय करूं मी बघुनि तुला हें काळिज तुटतें ॥ तव स्वरुपाला योग्य असा वर न मिळे ह्मणुनी मन बहु झुरतें ॥ दीनदयाघन पूर्ण करिल तो हेतु तव पाहीं ॥ सोडुनियां ही सकलहि चिंता स्वस्थ गृहीं राहीं ॥ मत्प्रिय० ॥

( इतक्यांत प्रधापुत्र वक्रतुंड प्रवेश करितो. )

दु० रा०—( त्याला पाहून ) या या वक्रतुंडराव. असे पुढें या. बरे वेळेवर आलांत.

शू० रा०—बाळे, आणखी किती दिवस तूं अशी अविवाहित राहणार या वक्रतुंडालाच आतां पसंत करून त्याच्याबरोबर सौख्य घे ह्मालें.

वसुं०—( संतापानें. )

पद—( जल खानेका दरोगा )

कैशी माया नाहीं ताता किमपि हृदयीं ॥धृ०॥ विपरीत तुह्मांला बुद्धी सुचली नवल गमे मन्मनीं ॥ आपुल्या हस्तें द्यावी मुक्ति चिरुनि कंठ हा ह्मणी ॥ कोणी वाली नाहीं नाहीं मजसि समयीं॥ के०॥१॥

दु० रा०-तें कांहीं चालायचें नाहीं; या वक्रतुंडरावाबरोबर तुला विवाह केलाच पाहिजे.

वसुं०-अहो आईसाहेब, तुह्मी आमच्या सापत्न माता अहांत तेव्हां तुह्मांला मी ज्यास्त सांगत नाहीं.

पद--( मज बोध करी० ) ही चाल.

या मूढासीं नच वरिं मी रूप तरि कसें ॥ वदन वक्र असुनि किती कुरुप हा दिसे ॥ धृ० ॥ चेष्टा करि पाहि कसा माकडापरी ॥ रत्न असें प्रसवलि ती धन्य सुन्दरी ॥ १ १

(रागानें निघून जातां जातां दासीच्या खांद्यावर हात टाकून)

पद--( दुनियामें साथशाहिवो० ) ही चाल.

कुणासि स्मरूं काय करूं सांग तूं तरी ॥ सुचत नसे कांहिं मनीं बहुत हुरहुरी ॥ धृ० ॥ अदय मदन सकल तनु हि विकल गे करी ॥ मनासि बहुत आवरिं मी राहिना परी ॥ १ ॥ ( जातात. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा.

चंद्रकांत- ( पडद्यांत ) शेर.

जगिं मी मदतगार तुझा असें ॥ कांहीं तुला तें कमती नसे ॥ भाळीं लिहिलें विधिनेंच ऐसें ॥ चंद्रकांत तव पती विलासे ॥ पती चंद्र कीं देवेंद्र जैसा ॥ १ ॥

वसुं०- [ स्वप्नांतून खडबडून उठून. ]

पद--( हमदम आवेरे० ) ही चाल.

झडकरी या कोणी ॥ धांवा धांवा सर्व मिळुनी ॥

॥ धृ० ॥ स्वप्न विचित्रची हें मज पडलें ॥ धडधड उरिं मम होतें हाय ॥ इथं कशा नाहीं कोणी ॥ कुठें गेल्या सर्व जणी ॥ देवा आतां दासीला या॥ त्राहि त्राहि तूं रे ह्मणी ॥ एकली मी काय करूं रंगसदनीं ॥ १ ॥

[ सर्व सख्या धांवत येतात. ]

पद—(प्यारी काहि काहि करत. ) ही चाल.

गडे भ्यालिस काय ह्मणूनी॥काय स्वप्न तरी नयनीं॥ पाहिलें उठलिस कां गे खडबडुनी ॥ धृ० ॥ इडा पिडा तव टळो पळो गे पाप अमंगळ दूर ॥ तो-जगदीश्वर पूर्णपरात्पर नुरवो तव हुरहूर ॥ शंका सोड ॥ अरीची खोड ॥ तोडुनि गिरिजापति शंकर॥ मनींचे जाण ॥ हेतू पूर्ण ॥ करील अवघे सदयपणीं॥ गडे भ्या० ॥

वसुं०- ( सख्यांस. )

पद.—( खरा जगांत मी एक० ) ही चाल.

काय सांगु मी एक स्वप्न नयनीं पाहियलें ॥ कोणि एक्या नरें मज स्वप्नीं वदन दाखविलें ॥ माझें हृदय हरुनि त्यानें मला मोहियलें ॥ दाखवा ती मदनमूर्ती मन्मन बहु घाबरलें ॥ नसे मला धीर आतां प्रिया-वीण जीव जळे ॥ का० ॥ १ ॥

चतुरिका०-[ आपल्या सख्यांना ] गड्यानों हिला जें हें आज स्वप्न पडलें आहे त्यांतील शुभाशुभ पाहण्याक- ४
रितां आपल्या शामभट जोशाला बोलावून आणिलें पाहिजे.

मदनिका०–अग कसलें शुभाशुभ पाहतां सांप्रत ती उपवरें झाली असल्याकारणानें ह्या मदनचेष्टा करीत आहे.झालें.

मंजु०–अग हा मदनिका अगदीं खरें बोलली एखाद्या छेलछबेल्याकरितां ओरडली असेल झालें.

चतु०–तें कांहीं असो, ज्या पेक्षां ही स्वमांत ओरडली आहे,त्या पेक्षां याचा अर्थ शामभटजीला विचारला पाहिजे.

वसुं०–सख्यानों माझ्या जिवलगाला मी कुठें बरें पाहूं? त्याच्यावांचून आतां एक एक क्षण युगासारखा भासत आहे

चतु०–गडे तूं कांहीं काळजी करूं नको. आतांचे आतां आपल्या हिराजी जमादाराला पाठवून शामभटजीला बोलावून आणिलें ह्मणजे ते या स्वमाचा खुलासा करतील. ( जमादारास हांक मारून ) जमादार अहो जमादार.

हि०ज०–[ हात जोडून ] जी बाईसाहेब.

चतु०–जा आतांचे आतां शामभटजीला घेऊन या चला लौकर.

हि०ज०–जोगेश्वरीच्या बोळांत राहतो तोच ना ?

चतु०–हो हो तोच बरें जा लौकर.

( जातो व शामभटजीला घेऊन येतो. )

हि०ज०–[ आपल्याशीं ] आतां याची थोडीशी थट्टा करावी. ( उघड ) अहो शामभटजी.

शा०भ०–अरे बाबा ह्मणतोस तरी काय ?

हि०ज०–इकडे असे या सांगतों काय तें [ त्याला बाजूला नेऊन ] आमच्या धाकट्या बाईसाहेबानां ह्मसोबानें स्वमांत असें सांगितलें आहे कीं, शामभट ह्मणून जे जोगेश्वरीच्या बोळांत रहातात, त्यांला आतांचे आतां आणून माझ्यापुढें बळी दे ह्मणजे तुझा इच्छित पति मिळेल.

शा०भ०-अरे बाबा मी माझ्या बायकोचा एकुलता एक आहे. माझी लाडकी बायको उघडी पडेल. तुला पाहिजे तर हें माझ्या आंगावरचें धोतर बक्षिस देतों हें घे आणि असें जाऊन सांग कीं शामभटजी गांवाला गेले आहेत आणि मीही आतांचे आतां हें राज्य सोडून आपल्या बायकोसह लांब कोठेंतरी निघून जातों.

हि० ज०तें कांहीं मी ऐकायचा नाहीं.

शा० भ०--(रडत रडत) नकोरे बाबा असें करूं.तुझ्या मी पायां पडतों हवें तर. ( जमादार त्याला ओढूं लागतो)

चतु०-(पुढें येऊन) काय गडबड आहे हो जमादार ?

जमा०--कांहीं नाहीं बाईसाहेब शामभटजीआले आहेत

चतु०-या या शामभटजी असे पुढें या (जमादारास) जमादार त्यांना आसन आणून द्या.

हि० ज०—होय बाईसाहेब. ( आसन आणून देतो.)

शा०भ०-अहो हें कशाला पाहिजे (भीत भीत पुढें होतो)

चतु०-बसा हो शामभटजी असे भितां कां ?

शा० भ०-नाहीं ह्मटलें,आज असें एकाएकीं कशाकरितां बोलावलेंत.

चतु०-शामभटजी तुह्मांला बोलावण्याचें कारण इतकेंच कीं आमच्या या सखीनें स्वप्नांत तरुण व सुंदर असा एक पुरुष पाहिला तर तो कोण असावा बरें ?

शा०भ०—(पंचाग उघडतो व कांहीं बोटें मोजून) हा आपल्याच शहरांत रहाणारा शिंप्याचा चंद्रकांत नांवाचा मुलगा आहे तो सांप्रत गरीब स्थितींत आहे. परंतु पुढें हा अप्रतिम ऐश्वर्यवान् होणार आहे. फार तर काय पण त्याची कीर्ति समुद्रवलयांकित पसरून स्वपराक्रमानें सर्व राजे आपले दास करून सोडील.

वसुं--(उद्वेगानें) माझें मन हरण करणारा तोच होय. आतां त्याची मला प्राप्ति केंव्हां होईल तें कृपा करून सांगा.

शा० भ०-बाईसाहेब आपण अशा उतावळ्या होऊं नका; येत्या वैशाखशुद्ध दशमीच्या दिवशींच त्याची तुह्मांला प्राप्ती होऊन उभयतां अप्रतीम सौख्य भोगाल.

वसुं०--जमादार, यांना प्रधानजीकडून हजार मोहरा बक्षिस देववा.

हि० ज०—आज्ञा बाईसाहेब ( जातात. )

वसुं०—( विव्हळ होऊन ) सख्यांनो.

पद.

सोसुं कशी या मदनव्यथेला ॥ कामानल करि दग्ध तनूला ॥ धृ० ॥ कांहिं सुचेना कांहिं रुचेना ॥ आलिंगिन कधिं त्या रमणाला ॥ सोसूं०॥शुद्ध बिजेच्या चंद्रापरिगे॥प्राणेश्वर तो भेटावें मजला॥सोसूं०॥१॥

सर्व०—पद—( खरी असे मी ) ही चाल.

त्यजिं सखे हि चिंता ईश आशा पूर्ण करिल सारी ॥ स्वमनीं शांति, ठेउनी, श्रीहरिचरणीं रत हो जाण निजांतरीं ॥ त्यजि० ॥ धृ० ॥

वसुं०-प्राणनाथावीण मजला शांति नाहीं खरी ॥ श्रीकांता, भगवंता, गुणवंता, मज आतां, प्रियनाथा दावि त्वरें ॥

सख्या—किती हैराण, करिशी प्राण, ध्यानीं आण॥

वसुं०—मला आतां या जगांत सख्यानों कोणि न उरला ॥ को० ॥

सख्या—त्यजि सखे० ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा. ( रस्ता )

हि० ज०—( प्रवेश करून. )

पद.—( पाय पायरे भेद० ) ही चाल.

पहा पहा ही मौज कैशी चाले हो या जनीं ॥ हाय हाय हे महा लुचे पहा कसे हो येऊनी ॥धृ०॥ ढोंग सोंग दावितात भाविकास फसवितात ॥ हे प्रभो, हे ढोंगी जगांत ॥ खोट्या थापा देतात ॥ पैसे काढून घेतात ॥ आपले खिसे भरतात ॥ त्यांचे पाडाया दांत॥ मी बनतों ढोंगी तसाच ॥ वाहवारे शामभटजी पंचांग उघडोनी ॥ साधिलास डाव खासा बगळाकीं होउनी ॥

आज त्या शामभटाचें कसब पाहून मी चकितच झालों बुवा. पंचांग उघडें केलें आणि कांहीं तरी बोटें मोजून हंहं ह्मणतां एक हजार मोहरा किहो मिळविल्या. असो या ढोंगी लोकांच्या भ्रमाचा भोंपळा फोडण्याकरितां मीही आज कांहीं तरी सोंग घेतों ( पाहिलेंसें करून ) वा! माझी बायकोही इकडेच येत आहे. तर आतां आपणही इथेच झोंपून रहावें ( झोंपतो )

गिरजा०—(ठुमकत ठुमकत येते व नवऱ्याकडे पाहून) अरे हा माझा नवरा तर इथेच निजला आहे. हरामाचें खाऊन निर्धास्त वाटेल तिथें पडून रहातो. जसा एरंड बनला आहे. (त्याला हालवून) अहो उठा उठा, हवें तिथें पडून रहातां याला ह्मणावें तरी काय?

हि०जा०—( वर उठून वेड्यासारखें )

( चूरण. )

तूं गे कोण येथें नार ॥ माझि कोठें गेली प्यार ॥ तिला

सत्वर इथें आण ॥ तुझी येतें मला वाण ॥ अग बोल,
अग बोल, अग बोल, बोल, बोल ॥

( तिला मारावयास लागतो. )

गिरिज०-अहो धांवा धांवा, हा मेला हसोबा वेड्या पिशासारखा होऊन मला मारीत आहे. धांवा लौकर.

रामभा०-( धांवत येऊन ) अरे काय आहे. जमादार अरे जमादार.

हि०ज०-हीच माझी प्रिया. हीच हीच.

रा०भा०-अरे मी तुझी प्रिया नव्हे. शेजारचा रामभाऊ आहें रामभाऊ !

हि०ज०-कोण तूं रामभाऊ.

( चूरण ).

तूं तो रामाभाऊ द्वाड ॥ माझी प्रिया किती गोड ॥
तिला जलदी इकडे धाड ॥ तिची मोडतों आतां
खोड ॥ अरे बोल, अरे बोल, अरे बोल ॥ बोल,
बोल, बोल ॥

( बाजूस आपणाशींच. )

कसली प्रिया कोठें जाण ॥ नव्हे भूत ना सैतान ॥
नाहीं देव ना हनुमान ॥ माझें सर्व ढोंग जाण ॥

( सर्वांच्या आंगावर जाऊन. )

अरे बोल, अरे बोल, अरे बोल ॥ बोल, बोल, बोल ॥

रा०भा०-खचीत याला वेड लागलें आहे.

गो०रा०-छे छे, भूतबाधा झाली असावी भूतबाधा.

के०रा०-याला पिंपळावरच्या मुंज्यानें धरलें आहे.

रा०भा०–आपल्या शामभट जोशाला आणूं चला.

गो०रा०–हो ठीक विचार काढलात. ( गिरिजेस ) अहो गिरिजाबाई, आह्मीं जाऊन शामभट जोशाला घेऊन येतों तोंपर्यंत याला नीट सांभाळा. ( जातात )

गिरिजा०–( बाजूला ) या मेल्यानें ढोंग केलें नसेलना? हो मला तर असेंच वाटतें. बरें आपणही कुठंतरी लपून हा काय करतो तें तर पाहूं या. ( तसें करते. )

हि०ज०–( सर्व गेलेसें पाहून ) " दुनया झुकती है, लेकिन झुकानेवाला चाहिये " ही ह्मण अगदीं खरी आहे. पाहतों आतां त्या शामभटाचें कसब.

पद.—( अहा अहारे बहार० ) ही चाल.

**अहा अहा ही कितितरी जहाली बहार ॥ ओहो ओहो हा कितितरी पडला मार ॥ रामभाऊ धांवा ॥ गोविंदराव धांवा ॥ केशवराव धांवा ॥ बळवंतराव धांवा ॥ अहा अहा० ॥ कसे कसे पाठीवर बसले पैंजार ॥ कशी कशी ती माझी ओरडली नार ॥ रामभाऊ धांवा गो० ॥ १ ॥**

गिरि०–( एकदम पुढें जाते व त्याला मारून ) अरे मेल्या ढोंग्या, लाज नाहीं वाटत अशीं ढोंगें करायला. रिकामटवळा आणि गांवास उपद्रव. ( तोंडांत मारून ) बोल तुला असें ढोंग करण्याचें कारण काय ?

हि०ज०–अग तूं माझी लाडकी ना ? असें काय बरें?

गिरि०–अहाहा ! हा उजेड त्या लाडकेपणाचाच पडला आहे वाटतें.

हि०ज०–अग तसें नव्हे. आपली राजकन्या वसुंधरा हिला कांहीं स्वप्न पडलें, ह्मणून त्या शामभटानें कांहींतरी

थापा मारल्या आणि हं हं ह्मणतां एक हजार मोहरा उपटल्या तर त्याच्या भ्रमाचा भोंपळा फोडण्याकरितां मीं हें मुद्दाम ढोंग केलें आहे. झालेंना? कां गेला राग? दे तर आतां गोडसा एक गालाचा मुका तुला मारलें त्याबद्दल पायां पडतों हवेंतर (पायां पडतो)

गिरि०—(त्याला लाथ मारून) चल मेल्या ढोंग्या माझ्याशीं बोलूं सुद्धां नकोस.

हि०ज०—(लंपटपणानें.)

पद.—(इस्पापी जगमें) ही चाल.

अग लाडके बायको रुससी कांगे मत्प्राण तूं ॥ दे आलिंगन ॥ प्रेमानंदें ॥ चुंबन दे दे ॥ मदनतप्त हा देह सखेगे ॥ शांत करीं तूं येये येये ॥

गिरिजा—

चल जा ढोंग्या ॥ तव हीं सोंगें ॥ अवघीं रे मी जाणतें ॥ मी जाणतें ॥

हि० ज० अग लाडके० ॥ १ ॥

गिरि०—निर्लज्जाची करुनी करणी ॥ करावया मग मम मन धरणी ॥ नाहीं मनीं तव लाज कशी रे ॥ वदन नको हें दाखवूं ॥ हें दाख० ॥

हि० ज०—लाडके० ॥ २ ॥

जाऊं कैसा सोडुनि तुजला ॥ सर्वांगाला कंप सूटला ॥ धीर नसेगे ॥ पदरीं घे घे ॥

गिरि०—शांत करा या दासीला ॥ या दा० ॥

(एकमेकांस आलिंगन देतात.)

विलें आणि हें ढोंगही माझ्याच करितां केलेलें आहे. हरकत नाहीं. मी पण नांवाचा शामभट आहें. अशी याची खोड तोडून टाकतों कीं, पुन्हां माझ्या वाटेसही जाऊं नये ! ( उघड ) अहो याला जबरदस्त पिशाचानें पछाडलें आहे.

**गो०रा०**–मग आतां तें पिशाच्च दूर होण्याला उपाय ?

**शा०भ०**– उपाय आहे, परंतु तो तुमच्या हातून झाला पाहिजे.

**स०शे०**–हो हो, तुह्मीं सांगाल तो उपाय आह्मीं करूं सांगा लौकर.

**शा०भ०**–जा तर आतांचे आतां दहा मण कथील आणून त्याचा रस करून तसाच्या तसाच गरमगरम त्याच्या कानांत ओता, ह्मणजे तें भूत याला सोडून हं हं ह्मणतां पळून जाईल. नाहींतर संध्याकाळपर्यंत याला नाहींसा करून तुह्मां सर्व शेजाऱ्यांची दुर्दशा करील. हं आटपा लौकर.

**के०रा०**–अहो रामभाऊ, अहो गोविंदराव, चला चला लौकर बाजारांतून कथील आणूं. ( जाऊं लागतात )

**हि०ज०**–हा भट पक्क्या गुरूचा चेला आहे. असो सध्या जिवावर आलेला प्रसंग कसातरी टाळलाच पाहिजे. (उघड) अहो भूत गेलें हो गेलें. आतां मला वेड नाहीं कांहीं नाहीं. हा पहा मी पूर्ववत् अगदीं चांगला झालों.

**शा०भ०**–छे छे हा अजून चांगला झाला नाहीं. हें पिशाच्च कांहीं थापा मारीत आहे. तुह्मीं याचें मुळींच ऐकूं नका.

**हि० ज०**—अहो शामभटजी, माझा भ्रम फिटला, आतां नका असें करूं मी पायां पडतों. ( साष्टांग नमस्कार घालतो. )

शा० भ०—( त्याला वर उठवून ) मूर्खा, पुन्हां कधीं माझ्या वाटेस जाशील काय ?

हि० ज०—छे छे अतःपर मी ह्मणून तुमच्या वाटेस कधींच जाणार नाहीं.

शा० भ०—जा तर तुला एकवार क्षमा केली आहे.जा.

( पडदा पडतो. )

## प्रवेश ४ था. ( रस्ता. )

( प्रधानपुत्र वक्रतुंड गात व नाचत प्रवेश करतो. )

वक्रतुं०—

पद.—( मी आषक बुलबुल ) ही चाल.

**मी आषक होउनी रडतों निशिदिनि वसुंधरे करितां ॥ लाभ तिचा मज होईल कधीं ही जडली मनिं चिंता॥ ॥ धृ० ॥ मदनाचा जणुं सुंदर पुतळा प्रकाश पडतो हा तनुचा ॥ ऐटबाज या सरदाराचा आकार अवघा माकडाचा ॥ १ ॥**

बरें पण मी इतका सुंदर मदनाचा पुतळा, पराक्रमी आणि देवगुरूसारखा शहाणाही.असें असून ती राजकन्या वसुंधरा माझा तिरस्कार करते. ( सचिंत उभा राहतो, चतुरिका दासी प्रवेश करते. )

चतुरिकादा०—( वक्रतुंडास पाहून ) हा मेला वक्रतुंड्या इथें काय करीत आहे. आणि आज सचिंत कां दिसत आहे ? काय मेल्याचें रूप तरी, तोंड एकीकडे तर डोळे भलतीकडेच. नाक पाहवें तर हातभर लांब. असें असूनही त्याला गर्व किती आहे. ( जवळ जाऊन) अहो महाराज, कां विचार कसला चालला आहे.

तक्रतुं०-( भ्याल्यासारखें करून ) कोण चतुरिके ? (हंसतो) मी ह्मटलें भूत कीं काय.बरें पण तूं चाललीस कुठें?

च०दा०-मी सुमंगला देवीच्या दर्शनाला जात आहें.

व०तुं०-अग मीपण तिकडे एक मोठा ह्मसोबा आहे त्याला नवस करण्याकरितां गेलों होतों.

च०दा०-नवस रे बाबा कशाकरितां?

व०तुं-कशाकरतां ह्मणजे, मी मदनासारखा सुंदर आणि भीमासारखा बळी असून ती राजकन्या वसुंधरा माझा अंगीकार करीत नाहीं ह्मणून.

च०दा०—

( चूरण )

वाः काय तुमचें रूप ॥ प्रति मदनानुरूप ॥
किंवा चंद्राचें स्वरूप ॥ पडे प्रकाश अहूप ॥
कां असेंच ना ॥ कां असेंच ना ॥ कां असेंच ना॥ १॥

व० तुं०—

मी विक्रमि जगांत ॥ करून मुष्टिचा आघात॥
पाडिन काळाचेही दांत ॥ मला जो कां मारील लाथ ॥
त्याला जोडिन दोन्हीं हात ॥ माझ्यासारखा या
जगांत कोणि असेल किं काय ॥ कोणि अ० ॥

चं० दा०—

वाः काय तुमची मात ॥ तुह्मी मारुनियां लाथ ॥
कराल मुंगिचाही घात ॥ तुह्मी सकल गुणांत ॥ पुरे
निपुण अहांत ॥ कां असेंच ना ॥ कां असेंच ना॥
कां असेंच ना ॥१॥

व०तुं०-होहो तर आतां तूंच सांग बरें? माझ्यासारखा छबुकडा हिला दुसरा मिळेल तरी काय?

चंदा०-खचितच तुमच्यासारखा मिळणार नाहीं बरें पण तुह्मी स्वतः कधीं तिला भेटले होतेत काय?

व०तुं०-एकदां कीं दोनदां; दहा पंचवीस वेळां मी तिच्या महालांत गेलों असेन आणि तूं सांगशील तर आतांही तुझ्याबरोबर यायला तयार आहें.

चंदा०-छे छे, माझ्याबरोबर नको उदयीक वसुंधरा वसंतोद्यानांत जाणार आहे, तर तिथें तुह्मीं या ह्मणजे ठीक जुळेल.

व०तुं०-खरेंच ना पण हें.

चंदा०-मी तुह्मांला खोटें सांगेन कां? उदयीक दहा वाजतां तुह्मी तिथें या, मी जातें आतां. ( जाते )

व०तुं०-(आनंदानें नाचून)

पद.—( मजा उडावूं मेकरके० ) ही चाल.

**वसुंधरा स्त्री मिळविन आतां ॥ वाहवा ॥ प्रेमभरें निशिदिनीं ॥ आलिंगिन रूपखणीं ॥ माझ्या परि नाहीं कोणीं ॥ भाग्यवान या जगांत पाहतां वसुंधरा० ॥ १ ॥**

( जातो. )

## प्रवेश ५ वा.

### स्थळ-वसंतोद्यान.

( बागेंत) सर्व सख्या दोन बाजूनीं उभ्या आहेत वसुंधरा ठुमकत ठुमकत येत आहे असा पडदा उघडतो )

स०स०-( वसुंधरेस उद्देशून. )

पद.—( जोबनमा रंगमा झूल० ) ही चाल.

पाहुनि मन दंगचि झालें ॥ चंद्रवदनी मृगनयना ॥
सखी किती ठुमकत ठुमकत चाले ॥ पा० ॥धृ० ॥
चमके जणुं ही चपले सम कीं ॥ पाहुनियां मन भृंग॥
दंग अनावर होत असे आज ॥ उडवूं आतां आह्मी
रंग ॥ दंग मन झालें० ॥ १ ॥

वसुंध०—

प्राणनाथ मज वदनचंद्रमा स्वप्नप्रसंगीं दाखवुनी ॥
रम्य मंदिरीं ॥ गुप्त जाहले काय करूं तरि शून्य
दिसे मज या भुवनीं ॥ १ ॥

स० स०—

काय ह्मणावें तुजला सखये ॥ झुरणी धरलिस
दिनरजनीं ॥ व्यर्थ अशीका ॥ ईश मनोरथ पूर्ण
करित तव चिंता दे ही सोडुनी ॥

वसुं०—

मदन तनु ही जाळीतसे कीं अवघी माझी क्रूरपणीं॥
काय करूं मी ॥ उपवनिं तरि मज शांति हें जाणुनी ॥
आलें या स्थानीं ॥ कंठुं कसे हे दिवस अतां मी ॥
प्राणपतिविण या भुवनीं ॥ काय करूं तरी ॥ मदनबाण
मज सहन न होती धीर न धरवे किमपि मनीं ॥ १ ॥

( इतक्यांत प्रधानपुत्र वक्रतुंड येऊन बागेचा दरवाजा
ठोकतो. )

व०तुं--( दरवाजा ठोकून ) अरे कोण आहे आंत, दार उघड.

वसुं०-सख्यानो, हा कोण दरवाजा ठोकीत आहे.

च०मा०-हा मेला तो वक्रतुंड्या असावा.

वसुं०-इश्श जळ्ळा मेला, तोग कशाला इकडे आला ?

चतु०-बाईसाहेब, येईना घटकाभर गम्मत होईल.

वसुं०-ही तुमची गम्मत मला बाई दुःखदायक होणार आहे.

चतु०-बाईसाहेब, तो किनाई आज कित्येक दिवस माझ्या पायां पडत आहे कीं, एक वेळ वसुंधरेची आणि माझी भेट कर ह्मणून. तर तुह्मी आतां येथून जा ह्मणजे मी त्याची चांगलीच फजीती करतें.

वसुं०—

पद.—( समज गवारि तुजेगरेकी० )

ह्या निर्लज्जाची करुकरुनि फजिति अती तृप्ती करूनि
घ्या तुह्मीं आपली ॥ घ्या तु०॥माकडचेष्टा पाहुनि
त्याच्या तृप्ती करूनि घ्या तुह्मीं आपली ॥ घ्या तुह्मी।
पुरे पुरे करूनि तया ॥ यथेच्छ झोडा॥ वदनही फोडा
तृप्ती करून० ॥ १ ॥

स० स०--

" सदर "

जा जा झडकरि येथुनि सखये पहात बैसही
सकल मजा ॥ ही सकल ॥ शंभुशिपाया

आणुनि येथें वेष तया आह्मीं देऊं तुझा ॥ आह्मीं अशापरी खरोखरी ॥ फसवुनी त्याला ॥ लावुं घराला ॥ पहात बैस ही सकल मजा ॥ १ ॥

( वसुंधरा जाते. )

चतु०–( आपल्या एका सोबतिणीस ) गडे तूंही जा, आणि आपल्या रामा गड्याला तोंडावरून बुरखा घालून चांगला शिकवून घेऊन येहो. ( ती जाते व बुरखा घातलेल्या रामा गड्यासह एक मोडकी खुर्ची घेऊन येते. )

व०तुं०–( गात व नाचत प्रवेश करतो. )

पद—( नृपतनयेवर० ) ही चाल.

सांगा सांगा मत्प्रियकांता वसुंधरा ती राजसुता ॥ गेली कोठें मदनमंजरी सुबक गोजिरी हेमलता ॥ ॥ धृ० ॥ विरहवन्हि हा दग्ध तनु करी ॥ दाखवा झणी नृपज सुंदरी ॥ मन झुरतें ॥ नच गमतें ॥ तिजवांचुनियां मम चित्ता ॥ सांगा० ॥ १ ॥

चतु०–अहो वक्रतुंड महाराज, असें वेड्या पिशासारखें काय करतां थोडा वेळ धीर धरा. शांतपणानें सर्व कांहीं होत असतें. ( मांडून ठेवलेल्या मोडक्या खुर्चीवर बसतो तों खुर्ची उलथून पडते. )

व०तुं०–( वर उठून ) चतुरिके, हेंग काय मी पडलों कसा? लागलें नाहींना कुठें. बरें हरकत नाहीं, पण तुह्मी सर्वजणी इथें आहांत आणि ती माझें मन हरण करणारी कुठें गेली.

चतु०–( बुरखा घातलेल्या रामा गड्यास दाखवून )

ही तुमची प्रिया. पाहिलीत का तुह्मांला लाजून कशी एके बाजूला उभी राहिली आहे. ती.

व०तुं०-(त्याच्याजवळ जाऊन) अग लाजूं नको, माझ्याजवळ गोड गोड कांहीं तरी बोल.तूं माझी लाडकी ना? मी तुझ्या पायां पडतों, हवातर साष्टांग नमस्कार घालूंका?

रामाग०-पुरे पुरे, दूर उभे राहा. आहे ठाऊक आपलें मजवर किती प्रेम आहे तें!

व०तुं०-माझे लाडके, असें नकोग ह्मणूं. हा माझा मदनासारखा देह तुझ्यावरून ओंवाळून टाकीन.

रा०ग०-पण हें तुह्मी खरेंच का बोलतां? मला नाहीं खरें वाटत.

वक्रतुं०-तुझ्या गळ्याची शपथ मी खोटें बोलत नाहीं.

रा०ग०-करा तर मग ईश्वराला नमस्कार.

वक्रतुं-छे छे,अग ईश्वराला कशाला तुझ्याच पुढें साष्टांग नमस्कार घालतों ह्मणजे झालें. माझी ईश्वरी तूंच आहेस. (न. घालतो)

रा०ग०-(त्याला वर उठवून) बरें आतां आपलें ह्मणणें तरी काय आहे?

वक्रतुं०-ह्मणणें काय विचारतेस,एकदां आपला वदनचंद्रमा दाखवून अधरपान दे ह्मणजे माझ्या बेचाळीस कुळांचा उद्धार झाला असें मी समजेन.

रा०ग०-या तर असे पुढें. (बुरखा काढून) हें पाहिलेंत का माझें वदन. (पाहून खजील होतो व सर्वजणी टाळ्या वाजवून हसूं लागतात.)

(पडदा पडतो.)

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

( स्थल जंगलांतील रस्ता. )

जादुगार०—

पद—( उर्दूअल्ला मिसातेरा. ) ही चाल.

**कैसा अंधेरा असे कीं येथें ॥ धृ० ॥ सननन बोले मृदंगा पतंगा ॥ आस मनींची गुरुदयेनें होवो पुरी ॥ भुतांचा डेरा हा सारा ॥ असे कीं येथें ॥ वसे माझा जालंधर गुरुजी ॥ विद्या ज्यानें दिली मला ती ॥ होवो पुरी ॥ १ ॥**

मी आहें जगाचा जादूगार, जादुन जग करीन पार, या जादुविद्येंत जो का धरील माझा हात, त्याला ठेवणार नाहीं जगांत; लोक ह्मणतात कीं शेराला सवाशेर असतो; परंतु मला मात्र तसा मिळणं फार कठीण, आणि जर कां तसा असला तर माझ्या गुरूनं दिलेल्या फाशानें पहातों ( फासे काढतो. ) चल बोल लवकर! एक, दोन, तीन, काय? (पुन्हां फासे तीनवेळ टाकतो व पाहून) काय? शत्रु आहे! पहातों आतां त्याचा समाचार कसा आहे तो, ( मुक्यास ) चलरे गुरु महाराजांचे दर्शनास जाऊं ( जातो. )

## प्रवेश २ रा.

---

### स्थल-जंगल.

( भूतें व जादुगार वेताळाची स्तुति करितात. )

पद.—( ब्यांडची चाल० )

गुरुनाथा तूं या जगतांत ॥ सुखकर असती आमुचा तात ॥ पाळिशि अह्मांला दिनरात ॥ सदया वद्वेना तव मात ॥ पाहीं ॥ पाहीं ॥ पाहीं ॥ सदया ॥ तूंचि आमुचा त्राता असती ॥ जाण ॥ विनंति आमुची ध्यानीं आण ॥ अर्पियले हे तव पदीं प्राण ॥

ज०गु०–माझे प्रिय सेवक हो, असें तुमच्यावर कोणतें संकट प्राप्त झालें आहे बोला.

जादू०–( हात जोडतो व त्याच्यापुढें ढोंपरें टेकून ) महाराज, या जगांत माझ्यापेक्षां जादुविद्येंत कोणी श्रेष्ठ असल्यास मला कृपा करून सांगावें हीच इच्छा आहे.

ज०गु०–अरे तुला या गोष्टीशीं काय कर्तव्य आहे.

जादू०–महाराज, माझ्यापेक्षां जो श्रेष्ठ असेल त्याचें नांव गांव सांगून माझ्या हस्तें त्याचा पराभव होईल अशी आपण कृपाही केली पाहिजे.

ज०गु०–अरे तूं या भानगडींत पडूं नको. तुला यश येणार नाहीं. व्यर्थ धोक्यांत मात्र पडशील.

जादू०–छे छे, या दासाची इच्छा पूर्ण केलीच पाहिजे. या कामांत माझे प्राण गेले तरी हरकत नाहीं.

ज०गु०—ठीक आहे तर ऐक. चित्रपूर शहरांत एक बारा पर्षांचा शिंप्याचा मुलगा आहे. तो तुझा शत्रु असून या जादूच्या प्रभावानें अप्रतिम ऐश्वर्यवान् होईल त्याच्या बापाचें नांव विश्वनाथ व आईचें भागीरथी आहे.

जादू०—गुरुमहाराज, असें आहे तर आपण दिलेल्या मंत्राच्या प्रभावानें त्याला जगांतून नाहींसा करण्यास मी सिद्ध आहें.

पद—(ये पुढती तुज० ) ही चाल.

**द्या आज्ञा मज गुरुराया ॥ रिपुवध करण्याला जाया ॥ याच क्षणीं ॥ जाउनी मी ॥ शत्रु नेइन तो विलया ॥ द्या आ० ॥ १ ॥**

ज०गु०—ठीक आहे. जातोसच तर जा; पण ही आंगठी सदोदित आपल्या जवळ ठेव. आणि ज्यावेळीं तुझ्यावर कांहीं संकट येईल त्यावेळीं ही जमिनीवर घांस, ह्मणजे माझे दूत त्या ठिकाणीं प्रगट होऊन तुला साह्य करितील. त्याचप्रयाणें ही काठी घे. आणि तुझा जो शत्रु चंद्रकांत त्याला हरप्रयत्नानें हिमालयाच्या दक्षिणेस एक मोठा पहाड आहे, त्या ठिकाणीं घेऊन जा आणि या काठीचा त्या पहाडास स्पर्श कर ह्मणजे तो दुभंग होऊन एक भयंकर भुयार तुझ्या नजरेस पडेल. त्यांत आपल्या शत्रूला पाठवून आंत असलेला कंदील आपल्या हस्तगत करून घे ह्मणजे, विजयी होशील जा.

स०भू०—

पद—(भ्यांडची) चाल.

**जा झडकरि मित्रा चल निघ जा ॥जा०॥ तूं साधु-**

नियां इच्छित काजा ॥ विजयी होउनि येईं सत्वर नमन कराया गुरुराजा ॥ जा० ॥ कल्पतरुच तो ॥ कंदिल गमतो ॥ मिळवूनी हरि शत्रु माजा ॥ १ ॥

( गुरूला वंदन करून जादूगार जातो. )

भूत-[ आपल्या बायकोजवळ जाऊन ]

पद—( भूतादि नाथा हा० ) ही चाल.

अधरपान तूं देईं सुंदरी ॥ मजसि प्रिये धीर नसे किमपि अंतरीं ॥ धृ० ॥

भुतडी-गुरुजी असती येथ धरा लाज लवभरी ॥ असे तुह्मी अधिर नका होऊं अंतरीं ॥ १ ॥

भूत-प्रेमवृष्टि तूं करिग मजवरी ॥ मजसि प्रि० ॥ १ ॥

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

### स्थळ—रस्ता.

जादू०—( प्रवेश करून. )

पद.(— खासे महाल विशाल० ) ही चाल.

नाहिं उणें जगांत मारिन शत्रुला लाथ पाडिन दांत अतां हां हां ह्मणतां ॥ घेउन कंदिल हातांत करिन त्याचा मी घात कोंडुन टाकीन गुहेंत पाहतां पहातां ॥ धृ० ॥ मग इंद्रासमान होईन ऐश्वर्यवान् छान स्थापन करूनी निजसत्ता ॥ मीन धरोनि प्रेम गुरुपदीं रमेन मज तोच असे जननी जनिता ॥ १ ॥

( कांहीं वेळ विचार केल्यासारखें करून ) हो हीच युक्ति आतां प्रथम चित्रपूर शहरांत जाऊन चंद्रकांताची भेट घेतली पाहिजे.

पद.-( आगे न आगे न० ) ही चाल.

युक्ति किती तरी छान ॥ पहा आली माझे मनीं, जाउनी मी ह्मणी, घेतों रिपुचा प्राण ॥ जगिं या मजसमान, मग कोणि नसे ॥ बहु धन्य असें मी खचित भाग्यवान् ॥ चाल ॥ वेषांतर करुनी जातों कपटें त्याला भुलवीतों ॥ घोर विपिनीं नेऊन सत्वर कापिन तेथें मान ॥ १ ॥

( जादूगार जातो. )

## प्रवेश ४ था.

---

### स्थळ-एक मैदान.

( चंद्रकांतासह शहरांतील कित्येक पोरें प्रवेश करतात. )

सर्वमुलें:--

पद—( खेलो करो खेलो० ) ही चाल.

खेळुं चला खेळुं चला ॥ अरे जरा खेळुं चला ॥
उडुं नाचूं मस्ती करूं ॥ चेंडुफळी डाव धरूं॥धृ०॥

१ ला मु०—असे आज आह्मां रजा ॥
२ रा मु०—ओ, ना, मा, सी, दूर त्यजा ॥
चंद्रकां०—खेळुं नाचुं करूं मजा ॥ हं: खेळुं ॥
अरे ज० ॥ १ ॥
१ ला मु०—येत नाहीं क, ख, ग, घ, ॥

२ रा मु०—येतो कोणा च, छ, ज, झ, ॥

चंद्रकां०—दूर करा त, थ, द, ध, ॥

स०मु०—अरे जरा खेळुं चला॥खेळुं चला ॥ खेळुं०

१ ला मु०—आज खेळुं विटीदांडू ॥

२ रा मु०—बरा नाहीं तोरे पांडु ॥

चंद्रकां०—चेंडुफळी खेळुं बेंडु ॥ हंः चेंडु० ॥

स०मु०—अरे जरा खेळुं चला॥खेळुं चला॥खेळुं०॥१॥

( मस्ती करूं लागतात. )

१ ला मु०—मस्ती येथें करिशी मुर्खा खाशील
तरि तूं मार ॥ हात पाय लंगडे होतां
रुदन करिशी फार ॥

स० मु०—चावटा दूर उभा रहा ॥ चावटा दूर०॥
चावटा० ॥ १ ॥

२ रा मु०—वेडें वाकडें वदनीं वदतां मारीन अशीं
कीं लात ॥ चक्कर येऊन खालीं पडशिल
तुटतिल बत्तिस दांत ॥

स० मु०—गाढवा दूर उभा रहा ॥ गाढवा० ॥
गाढवा० ॥ २ ॥

३ रा मु०—लहान तोंडीं वटवट करिशी तरि मी
देईन गुच्चा ॥ मोठा आला शहाणा येथें
बोलायाला हा लुच्चा ॥

स० मु०—पाजी दूर उभा रहा ॥ पाजी० ॥पाजी०॥

४ था मु०—भों भों भों ऐसें भोंकणारा हा कोणाचा
रे पोर ॥ पहा कैशी लांब जीभ करतो
हरामखोर ॥

स० मु०—कुत्र्या दूर उभा रहा ॥ कुत्र्या० ॥
कुत्र्या० ॥ ४ ॥

५ वा मु०—मळके कपडे बाप धुतो होतो बहु
बेजार ॥ बेटा छानछोकी करुनी फिरतो
दारोदार ॥

स मु०—धोब्या दूर उभा रहा ॥ धोब्या० ॥ धोब्या० ॥

चंद्रकां०—जारे जा तूं चेहरा कर जा असे तुझा हा
धंदा ॥ सोडुनि तो तूं कांरे करिशी भलभल-
त्या या छंदा ॥

स०मु०—न्हाव्या दूर उभा रहा ॥ न्हाव्या० न्हाव्या०

६ वा मु०—बाप कपडे शिवतां शिवतां गेला स्वर्गीं
जाण ॥ आई विकते सूत पोऱ्या ऐटींत
फिरतो छान ॥

स–मु०–शिंप्या दूर उभा रहा ॥ शिंप्या० ॥
शिंप्या० ॥ ६ ॥

(इतक्यांत आंतून चंद्रकांताची आई त्याला हाका मारते.)

भागिरथी—(पडद्यांतून) चंद्रकांत, अरे चंद्रकांत. तंटा तरी कोणाशीं करीत आहेस.

स०मु०—हुर्यो ! चंद्रकांताची हुर्यो हुर्यो !

भागि०—( बाहेर येऊन ) कोणरे ते, थांबा हो एका एकाचे कान उपटून हातावर देतें.(सर्व मुलें पळून जातात.)

पद.—( अरे हांरे तोरे० ) ही चाल,

अरे कांरे बाळा पोरांसंगें लागलासि या छंदा ॥
रात्रंदिन मी सूत विणीतें तूं तर त्यजिला धंदा॥तव
नाहीं पिता तो जिवंत तूंही दुर्दैवी मतिमंदा ॥

चंद्रकां०—आई न करीं वडबड ॥ ऐसी ॥ काय मला
तूं कमी मानिसी ॥

भागि०—कामधाम तूं सोडुन देशी ॥ निशिदिनीं ऐसा
भटकत फिरशी अरे कांरे० ॥ १ ॥

( भागि०—त्याला जवळ घेऊन )

पद.—( तव मुख निरखु० ) ही चाल.

अरे समज उमज मनीं करीं विचार ॥ अरे० ॥ काम
न करिसी फिरसी सतत रिकामा ॥ अ० ॥

चंद्रकांत०—

चिंता कां करिशी वृथा तूं जननी कर्ता असे तो
हरी ॥ भरंवसा तयावरि ठेव मग उणें न तुज या
जगांतरीं ॥

भागि०—जनिता तुझा तो त्यागोनि तुजला परलोकीं
गेला ॥ उदरपोषणासि पुढती न सुचे मार्ग
मजला ॥ हाय ! हाय ! हाय ! ॥

( जाऊं लागतात, इतक्यांत जादूगार मुक्यासह प्रवेश करतो. )

जादु०—( मुक्यासह प्रवेश करून ) माझ्या गुरूनें सांगितलेला जो माझा शत्रु तो हाच चंद्रकांत. ( त्याला अडवून ) अहा बाळा चंद्रकांता.

चंद्रकां०—( रागानें )

पद—( हं उरर उदर० )

हं दूर दूर दूर दूर खबरदार दूर होईरे ॥ मूर्खादूर होई रे ॥ तनु ही सकळ काळी काळी तव ॥ वाटतसे मज भीतीरे ॥ हं० ॥

जादू०—न धरिं मुला भय तूं चित्तीं ॥ काळी तनु ही
बघुनि रे ॥ जवळ येई रे ॥

चंद्रकांत–हं दूर दूर० ॥ १ ॥

करित फिरशी खुब तमाशे ॥ बनुनी वानर
ऐसारे ॥

जा०—वच हें मानींरे ॥

चंद्रकांत–हं दूर दूर० ॥ २ ॥

जादू०—( प्रेमातिशयानें. )

पद—( मी कुमार तीहि० ) ही चाल.

मी प्रियकर बंधु बाळा ॥ तव विश्वनाथ जनकाचा ॥
वागलों बाळपणीं प्रेमें ॥ बहु लोभ मजवरी त्याचा ॥
मी देश पहावे ह्मणुनी गेलोंरे त्यातें त्यजुनी ॥
तूं संशय न धरिं स्वमनीं ॥ प्राणप्रिय मी तव जन-
काचा ॥ मी० ॥ १ ॥

चंद्रकां०—(स्वगत.) हा माझ्या पित्याला बंधु ह्मणतो. परंतु तो किती गौरवर्ण आणि याच्याकडे पहावें तर हा केवळ कोळशांतील माणीक.

जादू०—( चंद्रकांताच्या आईजवळ जाऊन ) वहिनी, तुह्मी माझ्याविषयीं कांहीं मनांत संशय आणूं नका; मी तुमच्या लग्नापूर्वींच बाहेरगांवीं गेलों होतों.

भागि०—( विनयानें. ) आपण माझ्या पतीचे बंधु काय ? हाय ! हाय !

पद.—( रवहाल खुलजावे० ही चाल. )

कथुं मी काय तरि अतां ॥ दुःखसागरीं लोटुनी मजला प्राणनाथ गेले ते स्वर्गीं ॥ नाहीं नाहीं कांहीं आतां सदुपाय करूं काय हाय भगवंता ॥ आश्रय जगतीं मुळींच आह्मांला ॥ कुणिही खरोखर नच उरला ॥ दीनदयाळा श्री जगपाला तुझ्याविणें नसे वा वालि मला,आतां अशा वेळीं जाण भगवंता ॥१॥

जादू०—( लटकाच दुःखातिशय आणून. )

पद.—( बाह्वुरी वजाई काना० ) ही चाल.

हाय हाय काय करूं बंधुविणें मी पुढें ॥ कोसळले भासतात मदंगावरी कडे ॥धृ०॥ प्राणप्रिय बंधुराय हाय अंत पावला ॥ निर्दया अरे यमा दया कशी नये तुला ॥ बंधुभेट नाहिं कां रे व्हावया दिली मला॥ चंद्रकांत बाळ करुनी टाकिलेंस बापुडें ॥ हाय०॥१॥

हाय हाय ! वहिनी ! मी माझ्या बंधूच्या भेटीकरितां किती उत्सुकतेनें आलों होतों. परंतु माझ्या दुर्दैवानें त्याची

मरणदुर्वार्ता ऐकून मला ह्या जीविताचा कंटाळा येऊन हें सर्व जग उदास भासूं लागलें, तथापि तुह्मी काहीं काळजी करूं नका.

भागि०—भावोजी, घरीं धन द्रव्य किती होतें तें तुह्मांला ठाऊक असेलच, त्यांच्या पाठीमागें मी कसे दिवस काढीत आहें तें काय सांगूं.

जादू०—

पद.—( रुदनातें कां कारिसी० ) ही चाल.

चिंता ही दे सोडुनी धन दौलत तुज नच कमती ॥
चंद्रकांत मम तनय असे तूं जननी सम वहिनी ॥
प्रेमें राहूं ॥ सौख्य सेवूं ॥ ईश ध्यावूं ॥ अंतिं जाऊं
प्रभुच्या पदकमलीं तूं शांति धरीं चित्तीं ॥चिं०॥१॥

चंद्रकां०—( विनयानें. )

पद.—( भो वंदन तव पायां० ) ही चाल.

मी प्रेमें पद नमितों ॥ तूं सदया ॥ तव तनया ॥
संरक्षीं बा ॥ मी प्रे० ॥ धृ० ॥

जादू०—तव भाग्यशशि उदया आला ॥ तूं सोडुनि
दे ह्या चिंतेला ॥ नित झिजवुनि मी आपुल्या तनुला ॥
तुज ठेविन सौख्यांतचि बाळा ॥

चंद्रकां०—मी प्रेमें० ॥ १ ॥

जादू०—( कांहीं द्रव्य देऊन. )

पद—( दिलदारीकिनिर० ) ही चाल

घे बाळा द्रव्यहें ॥ घे बाळा० ॥

चंद्रकां०—वाहवा ॥ वाहवा ॥

जादू०–मी सांगुं किती तुज यापुढती ॥ कांहीं न कमती ॥ जगतीं ॥

भागि०–जाहलें मी आभारी ॥ सत्य हें ऐकुनियां बोले हे ॥ आजवरी आह्मी दुःख भोगिलें ॥

जादू०–परि आतां तें विलया गेलें ॥

चंद्रकां०–ह्मणुनी ॥ सदया ॥ आह्मां तुह्मी सांभाळा विनती हे ॥

( पडदा पडतो. )

---

## अंक २ रा.

### प्रवेश १ ला.

### स्थळ–जंगल.

( चंद्रकांतासह जादुगार प्रवेश करतो. )

चादू०—( स्वगत. )

पद.–( अरहम बागके० ) ही चाल.

मिळवुनी तो अतां कंदील ॥ अगम्य खेळ करीन भुवनीं ॥ गुरुसुदयें कसें आलें, कार्य माझें सहज जुळुनी ॥ कशाचीही उरलि नाहीं, अतां चिंता मला ह्मणुनी ॥ सुभाग्याचा मीच साचा, जनीं माझ्या परि न कोणी ॥ १ ॥

चंद्रकां०—मला आज अशा जंगलांतून नेतां तरी कुठें ? मी अगदीं थकून गेलों आहें; आतां कृपा करून मला माझ्या घरीं घेऊन चला.

जादू०—(त्याच्या तोंडावर हात फिरवून.) बाळा चंद्रकांता, तुला भूक का लागली आहे. घाबरूं नको, येथून जवळच एक रमणीय बाग आहे तिथें गेल्याबरोबर तुला सुंदर फळें आणि पाणी देतों चल.

**चंद्रकांत—**

पद—( कथंव खपा होते० ) ही चाल.

**तें पाणी सुंदर फळें नको मज ताता ॥ पोंचवा गृहीं मज सत्वर नेउनी आतां ॥ गृहीं मार्गप्रतिक्षा करीत राहिल माता ॥ ह्मणुनियां विनवितों मान्य करा गुणवंता ॥१॥ या जगांत मजला तुजविण अन्य न त्राता॥ मनिं सतत वाढवा मजवरची ही ममता ॥ १ ॥**

**जादू०—**

पद.

**जरा दे ध्यान ॥ मदीय वच मान ॥ तुला धनवान् ॥ करीन मी जाण ॥ हट्ट न करितां चल चल आतां ॥ फत्य कराया आपुलें काम ॥ पूर्ण प्रीति ही तुजवरि माझी ॥ वाहतों ही तव मी घे आण ॥ अससि मत्प्राण ॥ तव पदीं जाण॥ विनंती मान ॥ विनंती मान ॥ हट्ट न० ॥ १**

( मुका शिद्दी खुणेनें त्याला मानूं नको असें सांगतो· )

**चं० का०—**

पद.—( दिल आबान तुलन० ) ही चाल.

**कशि मदिय तुज न करुणा ॥ करुणा ॥ काका ॥ करीं सुदया ॥ वा या ॥ तनया ॥ जाया ॥ द्या आज्ञा**

॥ कशि० ॥ मम पद दुखती अति गमनें ॥ चलवेना मज इथुनी ॥ तव चरणीं मी नमुनीं ॥ मागें ॥ जाया ॥ आज्ञा ॥ निजभवना ॥ कशि० ॥ १ ॥

जादू०—

पद—( नजर्था मिलाई जाउ० ) ही चाल.

किति रे शंकित तरि होसी अजुनि मनीं ॥ कार्या करुनि त्या जाऊं किं सदनीं ॥ किति० ॥ होशिल जगिं तूं धन्य किती हें सांगुं मि वारंवार ॥ खचीत तुजसीं दावितों पहा धनराशी रे अपार ॥ त्या बाळा तूं घेईं ॥ तुज पाहिं अतां कांहीं ॥ कमती नाहीं जनीं ॥ किति० ॥ १ ॥

( जादुगार हात धरून नेऊं लागतो. )

( मुका शिद्दी त्याला न जाण्याची खूण करितो. )

चं०कां०—( जादुगारानें धरलेला हात सोडविण्याचा प्रयत्न करून. )

पद—( पापी दूर पापी दूर० ) ही चाल.

मला सोड मला सोड मला सोड रे ॥ नको त्रास ॥ तव सहवास ॥ पुरली आस, माझी खास ॥ मला० ॥ धृ० ॥ द्रव्यलोभ दावितोस व्यर्थ हा खरोखरी ॥ दयालेश नाहीं तुझ्या खचित जाण अंतरीं ॥

जादू० मान, मान, मान, मान, मान, मान, मान, ॥

चंद्रकां०—

पद.—( न वद वच हे तव शेवटचे ) ही चाल.

मजसि नच खचितची आस मनीं ॥

परत जाऊं चल निज सदनीं ॥

जादू०—रमणिय उपवन तें बघुनी ॥

जाऊं परत मग निजसदनीं ॥

चं०कां०--हूँ ! हूँ !

जादू०—चल चल !

चं०कां०—नच वद मज चल.

जादू०—चल चल चल.

( मुका न जाण्याची खूण करीत असतां जादूगार त्याला घेऊन जातो. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ-पहाडांतील गुंफा.

( जादूगार चंद्रकांत व मुका यांसह प्रवेश करतो. )

जादू०-(स्वगत) अहा ! गुरुमहाराजांनीं सांगितलेला हाच तो पहाड, ज्या कंदिलाकरितां हा देह झिजवीत आहे तो कंदील हस्तगत करून घेऊन मी आज या जगांत धन्य होणार- असो आतां गुरुमहाराजांनीं दिलेल्या काठीचा या ठिकाणीं उपयोग केला पाहिजे. ( काठी फिरवून पहाडावर मारतांच पहाड दुभंग होऊन गुफेंत जाण्याला रस्ता होतो ) बाळा चंद्रकांता, या रस्त्यानें आंत जा ह्मणजे आंत गेल्यावर एक कंदील तुझ्या दृष्टीस पडेल तो घेऊन ताबडतोब परत ये. जा घाबरूं नको. ( मुका न जाण्याविषयीं खूण करतो. )

चंद्रकांत—छे छे ! माझ्यानें आंत जाववणार नाहीं.

**जादू०**--( तोंडावर हात फिरवून ) बाळा, असें करूं नये. तूंच जाऊन तो कंदील आणला पाहिजे.

**चंद्रकां०**--काका, माझ्यानें आंत कसें बरें जाववेल? अहो त्या आंतील दरवाज्यावर शिळा तरी पहा केवढी मोठी दिसत आहे ती.

**जा०**-अरे गुरूचें नांव घेऊन ती शिळा बाजूला कर जा. पाहतोस काय?

**चंद्रकां०**-बरें आंत गेल्यावर त्या ठिकाणीं कुणी मला मारलें अगर खाऊन टाकलें तर माझें रक्षण कोण करील?

**जा०**-(मनांत) हो. हा ह्मणतो तें खरें आहे. याला जर आंत कोणीं खाऊन टाकलें तर तो कंदील तरी माझ्या हातास कसा येईल? (उघड) बाळा चंद्रकांता, ही आंगठी घे आणि आपल्या हातांत घाल. ज्यावेळीं तुझ्यावर कांहीं संकट येईल त्यावेळीं हिचें तूं जमिनीवर घर्षण कर ह्मणजे संकटांतून मुक्त होशील. जा घाबरूं नको.

**चंद्रकांत**--( आंत जातो. )

**जा०**--अरे चंद्रकांता, अजून आंत काय करीत आहेस. अगोदर कंदील दे.

**चं०कां०**--(आंतून) येथें भयंकर अंधार झाला आहे. तर अगोदर मला वर घ्या मग मी तुह्मांला कंदील देतों.

**जा०**-अरे अगोदर कंदील दे ह्मणजे तुला मी वर घेईन.

**चं०कां**-मला वर घेतल्याशिवाय मी कंदील देत नाहीं.

**जा०**--दिला पाहिजे.

**चं०कां०**--देत नाहीं.

**जा०**-असें काय? (मुक्याला ही आंत लोटून देतो व जातो.)

( गुंफा फुटून बगीच्या होतो )

## स्थळ-हिराबाग,

चं०कां०—( बागेंतील शोभा पाहून. )

पद—( सुवर्ण केतकीपरि जो० ) ही चाल.

**किती मनोहर उपवन तरि हें नंदनवन गमतें मजला॥ आनंदानें मानस भरतें पाहुनि या उद्यानाला ॥ अगणित धन हें पाहुनि नयनीं तोष होतसे चित्ता-ला ॥ वास असावा क्षिराब्धीच्या तनयेचा येथें झाला ॥ १ ॥**

(आश्चर्य कारक) बरें पण या ठिकाणीं अमूल्य असे हिरे, माणकें इत्यादि मनाला थक्क करून सोडणारे पदार्थ असून त्या आमच्या वेड्या काकानें हा जुना पुराणा दिसत असलेला यःकश्चित् कंदीलच तेवढा घेऊन ये ह्मणून सांगितलें याला ह्मणावें तरी काय ? किती मूर्ख हा. असल्या बिनमोल कंदिलाकरितां केवढा प्रयत्न तरी. ( हातांतील कंदिलास फुंक मारतो. कंदील विझून सर्व अंधारमय होतें, तें पाहून भ्याल्यासारखें )

चं०कां—( एकाएकीं मुक्याला पाहून ) अरे हा कोण मुका. ( मुका त्याला दरवाज्यावर शिळा ठेवून जादूगार गेल्याचें खुणेनें सांगतो.

चं०कां०—काय तो गेला काय ?

पद—( मदन दहन करी तनु० ) ही चाल.

**अहा कशी ही परि घडली ॥ कंदिल विझतां गुहा व्यापिली अंधारानेंही सगळी ॥ अ० ॥ धृ० ॥ गुहे मधुन मी जाइन केव्हां ॥ नाकळे ॥ मज वेळ**

**वरी ॥ न च आज खरी ॥ भो जगदीशा धांव झड-**
**करी रक्षि सदया यावेळीं ॥ १ ॥**

( जमिनीवर आंग टाकतो तों हातांतील आंगठीचें घर्षण होऊन एक विक्राळ पुरुष प्रगट होतो. )

आं०—( हात जोडून चंद्रकांतास )

पद—( काय हो हुकूम धनी० ) ही चाल.

**मान्य मान्य मान्य मला हुकुम असे आपुला ॥**
**काय काय काय काम तें त्वरें वदा मला ॥ धृ० ॥**
**उभा तुह्मां पुढें हा दास हात जोडुनी असे ॥**
**चाकरी करावयास न्यून हा न करीतसे ॥ १ ॥**

महाराज ! या आज्ञाधारक सेवकाला बलावण्यासारखें आपणावर कोणतें संकट प्राप्त झालें आहे ? सांगा लौकर क्षणांत मुक्त करीन, घाबरूं नका.

**चं०कां०**—मी तुला बलावलें नाहीं.

**आं०दू०**—काय या हातांत असलेल्या आंगठीचें आपण घर्षण केलें नाहीं काय ?

**चं०कां०**—मी दुःखातिशयानें जमीनीवर पडलों तेव्हां घर्षण झालें असेल.

**आं०दू०**—बस्स तर, मी या आंगठीचा ताबेदार आहें. बोला काय हुकूम आहे ?

**चं०कां०**—( स्वगत ) त्या दगेबाज माझ्या शत्रूनें ही आंगठी मला दिली त्यावेळीं असेंच सांगितलें होतें कीं- जेव्हां तुझ्यावर कांहीं संकट येईल तेव्हां या आंगठीचें घर्षण कर ह्मणजे संकटांतून मुक्त होशील.

**आं०**—कां महाराज, कसला विचार चालला आहे आपलें जें काम असेल तें लौकर सांगा हा दास सिद्ध आहे.

चं०कां०—असें आहे तर या ठिकाणीं असलेले हिरे, रत्नें, जवाहीर इत्यादि बरोबर घेऊन या मुक्यासह मला माझ्या घरीं घेऊन चल.

आं०—ठीक आहे, आपला हुकूम शिरसामान्य आहे.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थळ—चंद्रकांताची झोंपडी.

चंद्रकांताची आई; चंद्रकांत एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें सखेद प्रवेश करते. )

भागि०—

पद—( सुनेदिलदार० ) ही चाल.

गमे पुत्रावीण मजला शून्य भुवनीं ॥ मनीं शांती अन्य नाहीं लवहि ह्मणुनी ॥ धृ० ॥ त्यजुनि मजला तनय गेला कसा नकळे ॥ जगत्पाला मला दावीं तया नयनीं ॥ गमे० ॥ अनावर हा विरह त्याचा कसा साहूं ॥ विष खाऊं किंवा जाऊं घोर विपिनीं ॥ गमे० ॥ १ ॥

क्या निर्दयानें माझ्या बाळाला कुठें बरें नेलें असावें.

पद—( खरोखर वदते० ) ही चाल.

भेटरे मजसिं तूं झडकरीं ॥ तुजविणें ॥ या मनें ॥ खचितचि वदतें निशिदिनिं बाळा घेतली हुरहुरी ॥ भेट० ॥ धृ० ॥ कोण अधम तो कोठुनि आला कपटें मोहुनियां तुजसीं ॥ कोठें गेला, बाळा तुजला, घेउनियां तो अरी ॥ भेट० ॥ १ ॥

( इतक्यांत मुक्यासह चंद्रकांत प्रवेश करतो )

चं० कां०—( एकदम पुढें जातो व आईस भेटून. )

पद—( पंच महाभूतें तशी० ) ही चाल.

प्रियकर मम आई तुला काय कथुं तरी ॥ छळिलें त्या अधमानें मजसिं बहु परी ॥ धृ० ॥ नेउनियां मला दरींत दिधलें लोटुनी ॥ क्रूर असा मनुज नसे त्यापरी जनीं ॥ ईशकृपें भेट तुझी जाहली खरी ॥ चिंता मजविषयीं आतां न धरिं अंतरीं ॥ १ ॥

आई, सविस्तर हकीगत मागाहून सांगेन. कारण माझे प्राण भुकेनें व्याकुळ होत आहेत, करितां प्रथम मला कांहीं तरी थोडें खावयाला आणून दे.

पद—( ये बदीमें पाया गम० ) ही चाल.

भागि०—

या दैवें मज बेजार, करूनियां फार ॥ सोडिलें अरे रे खास ॥ नको हा त्रास ॥ पुरे संसार ॥ या दैवें ॥ धृ० ॥

चं०कां०—त्या सूतविक्रयीं त्रास ॥ न घेईं खास ॥ जननि गे जगांतरीं जाण ॥ सुखाचें स्थान ॥ पावलों खास ॥

भागि०—तूं वदसी सर्व खरें तें ॥ परि या समयाला तूतें ॥ देउं मी काय खायातें ॥ किति सांगुं वारंवार ॥ तुला मी फार ॥ न च धन धान्यादिक गृहीं ॥ अन्यही कोणाचा आधार ॥ या दैवें० ॥ १ ॥

चं०कां०—हा कंदिल विकुनी धान्य ॥ प्रथम जा जाण ॥

जगदीश स्मरुनि दिनरात ॥ मनुज राहतात र-
क्षितो त्यास ॥ १ ॥

भा०—(कंदील हातांत घेऊन) बाळा या कंदिलावर अतिशय मळ बसल्या मुळें फारच जुना दिसत आहे. तर याला घांसून पुसून अगदीं स्वच्छ नव्यासारखा करून नेतें ह्मणजे कोणीही विकत घेईल.(असें ह्मणून ती तो घांसूं लागते त्याबरोबर एक विक्राळ पुरुष प्रगट होतो. त्याला पाहून ती भयानें मूर्छित पडते. )

कं०दू०—( प्रगट होऊन. )

पद—( शुद्ध बीज तें न गुप्त० )ही चाल.

कथन करा काय हो हुकूम तो त्वरें मला ॥ धरा-
हि नेऊं स्वर्गिं किंवा स्वर्ग आणुं भूतला ॥ धृ० ॥
कंदिलाचा दूत मी असें ह्मणून या स्थला ॥ घांशि-
तांच पातलों न धरा लवहि भीतिला ॥ असेल हा
ज्यासि त्यास धनीच जगीं आपुला ॥ मानुनियां
शांतवितों दास्य करुनि त्याजला ॥

चं०कां०—सत्य वचन वदसि जाईं त्वरित येथुनी ॥
उत्तमान्न आणुनियां देईं मजसि या क्षणीं ॥

कं०दू०—शांतवावया तुह्मांस देह हा मी आपुला ॥
झिजवुनियां सत्य सत्य पूर्ण करिन हेतुला ॥ १ ॥

( कंदिलाचा दूत गुप्त होतो व पंचपक्वान्नांचें ताट चंद्र-
कांतापुढें आणून ठेवून जातो. )

चं०कां०-(ताट पाहून आनंदानें आईस सावध करून.)

पद.—( न च तुह्मां संतती ) ही चाल.

**आई आतां चिंता तुज किमपीही न च उरली ॥**
**दीनदशा ईशदयें सत्य सकल ती सरली ॥ धृ० ॥**
**प्राप्त मला होइल जें इच्छित तें यावेळीं ॥ नाहिं आतां**
**कांहिं उणें या जगतिं मजसि मुळीं ॥ १ ॥**

(पडद्यांत दौंडी पिटतात) "ऐका हो! आज महाराजांची कन्या वसुंधरा गंगेवर स्नानाला जात आहे; करितां त्या मार्गाला कोणी मनुष्य आढळेल तर तो राजाज्ञेप्रमाणें शिक्षेला पात्र होईल रे बाबानों!,

चं०कां०—(ऐकून)आई कसली ग ही दंवडी पिटतात? (पुन्हां पूर्ववत् दौंडी होते)

भागि०—(ऐकून) बाळा, आपल्या महाराजांची कन्या वसुंधरा ही आज गंगेवर स्नानाकरितां जात आहे. ह्मणून त्या मार्गानें कोणी जाऊं नये अशाबद्दलची ही दौंडी आहे. तूंही तिकडे जाऊं नको हो. नाहींतर भलताच एखादा प्रसंग येईल.

चं०कां०—आई, रस्ते बंद करण्याकरितां जर राजानें दौंडी पिटविली आहे; तर ती राजकन्या अशी आहे तरी कशी तें पाहण्याकरितां मी जाणार.

भागि०—पद—( नसे भीनी मुळीं० ) ही चाल.

**असें वदण्या जरा तुजसीं ॥ भीति नच कैसी ॥ या**
**योगें तूं खचितचि बाळा दुःखार्णवें पडसी ॥धृ० ॥**
**नृपदुहितेला ॥ बघण्याची तूं ॥ इच्छा कां करिसी॥**

ऐकुनि माझें ॥ वचन जरि या ॥ हट्टाला त्यजिसी॥
तरीच भोगुन सौख्य जनीं तूं आनंदें रहासी ॥ १ ॥

चं०कां०—आई, तूं कांहीं काळजी करूं नको. मी कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा एखाद्या झाडावर जाऊन बसतों तुला भिण्याचें मुळींच कारण नाहीं. ( जातो )

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ—गंगातीरचा बगीच्या.

( सर्व सख्यांसह वसुंधरा प्रवेश करते )

वसुंध०—( प्रवेश करून. )

पद.—( तिळतीळ तुटे० ) ही चाल.

प्रियकरासि एकाकीं स्वप्नीं पाहिलें ॥ जागृतींत
परिग सखे गुप्त जाहलें ॥ तत्स्वरूपीं पंच प्राण
पूर्ण गुंतले ॥ राहती कीं देहिं न हे मजसिं नाकळे॥
प्रि० ॥ १ ॥

चतुरि०—बाईसाहेब, आपली इच्छा पूर्ण होण्याचा समय जवळ आला आहे. आपण काळजी करूं नका बरें. आपण स्नानाला जातानां विलंब करूं नका. कारण महाराजांनीं लौकर या ह्मणून सांगितलें आहे; ह्मणून ह्मणतें.

वसुंध०—हो मी स्नान करून लौकर येतें पण तोंपर्यंत तुह्मी इथेंच असा हो. ( ती गंगेंत स्नान करण्यास जात आहे इतक्यांत चंद्रकांत येतो. )

चं०कां०—( वसुंधरेस पाहून )

पद.—( राम स्मरावा राम० ) ही चाल.

राजसुता सकुमार ॥ खरोखर ॥ राज० ॥ धृ० ॥
उडुराजमुखी कमलमीनाक्षी ॥ कामाची तलवार ॥
जलाल ती ॥ राजसु० ॥ १ ॥ केलें मजला ठार
तियेनें ॥ करुनी मजवरि वार ॥ अनावर ॥
राजसु० ॥ २ ॥

अहाहा ! हिचें स्वरूप पाहिल्यापासून मी देहभानरहित झालों आहें. खरोखर ही स्त्री जर मला मिळेल तर माझ्यासारखा भाग्यवान् या जगांत दुसरा मिळणेंच कठीण.

वसुंध०—( स्नान झाल्यानंतर चतुरिकेस ) चतुरिके, चलायचेंना आतां? माझें स्नान झालें. ( चतुरिकेच्या खांद्यावर हात टकून. )

पद—( सांब स्मराहो० ) ही चाल.

धीर धरूं गे किती धीर धरूं गे ॥ चैन नसे दिनरजनीं काय करूं गे ॥ धृ० ॥ त्राण नसे गे मुळिं त्राण नसे गे॥ मनरमणावांचुनि जग शून्य दिसे गे। १ ॥

---

## प्रवेश ५ वा. ( रस्ता )

चं०कां०—( प्रवेश करून. )

पद—( भूवरि या आशेचा० ) ही चाल.

वसुंधरेच्या स्वरूपतेजें शांत जाहलें मन हें माझें ॥
गौरवर्ण तनु नाजुक बांधा ॥ सुबक चालणें डौलहि
साधा ॥ काम करुनि बेफाम मजला सोडितसे हा

किती ॥ असह्य शर हृदयावरी सोडुनी करी तनुची माती ॥ वसुंधरेच्या० ॥ १ ॥

( वर पाहून ) अहाहा ! मदना त्या सुंदरीसाठीं.

पद.–( हरी थांब तरी ० ) ही चाल.

रतिप्राणप्रिया, मज छळिसि दिना अपराध विना, वद् बा मदना ॥ धृ० ॥ शर कुसुम असति परि कहर करिति कशि नाहिं नाहिं तुजला करुणा ॥ ॥ मज० ॥ शीतल ह्मणविशी वन्हिच गमसी ॥ नच चंद्रा तुज बा लाज कशी ॥ रे हे खल कुटिला ॥ १ ॥

---

## प्रवेश ६ वा.

### स्थळ चंद्रकांताची झोंपडी.

( आईसह मुका विचारांत आहे असा पडदा उघडतो. )

चं०कां०—( प्रवेश करून ) अहाहा ! आई, काय त्या राजकन्येचें स्वरूप तरी, मला तीच स्त्री प्राप्त करून दिली पाहिजे.

भागि०—बाळा चंद्रकांता, काय हें.

पद—( जन्म कां वृथा दिला० ) ही चाल,

व्यर्थ कां असें तुला ॥ वेड लागलें मुला रे ॥ धृ० ॥ राव रंक नच समान ॥ वदतें हें ध्यानिं आण ॥ योग्यतेनुसार जाण ॥ वागे तोचि चांगला रे ॥ ॥ व्य० ॥ १ ॥ लोकमान्य व्हावयास ॥ सुविचारें वागलास ॥ तरीच सौख्य तें अह्मांस ॥ उभय लोकिं सत्कुला रे ॥ व्य० ॥ २ ॥

**चं०कां०**—आई, मग यांत माझें कुविचारी वर्तन तें काय ( मुक्यास जवाहीर व रत्नें आणण्याची खूण करितांच तो जातो. )

**भागि०**—अरे तसें नव्हे. रुचेल तें बोलावें आणि पचेल तें खावें, अशी एक ह्मण आहेना? भलतीच इच्छा धरून कसें होईल? विचार कर.

**चं०कां०**—आई तें कांहीं असो. तूं आतांचे आतां राजाकडे जाऊन वसुंधरेची मागणी केलीच पाहिजे.

**भागि०**—

पद.—( कुणिही करिल रोष ० ) ही चाल

**कशि मी नृपतिसदनीं जाऊं ॥ बाळा, मजला, कथिंरे ॥ नृपति० ॥ धृ० ॥ राजद्वारीं रंकापरी गेलें मी जरी ॥ हाकुनियां देति मजलादूत सत्वरीं ॥ माझी गती होई तेथें कैशी रे तरी ॥ ह्मणुनी, त्यजिं या छंदा ॥ स्वस्थ गृहिं राहूं ॥ क० ॥ १ ॥**

बाळा चंद्रकांता, तूं यःकश्चित् शिंप्याचा मुलगा आणि ती वसुंधरा ह्मणजे सार्वभौम ह्मणविणाराची कन्या; असें असतां ती तुला कशी प्राप्त होईल? ( मुका रत्नें व जवाहिरानीं भरलेलें ताट आणून पुढें ठेवतो. )

**चं०कां०**—( तें ताट आईस दाखवून. ) हं, चल हीं रत्नें व जवाहीर त्या राजाला नजराणा नेऊन दे. आणि मी सांगितल्याप्रमाणें वसुंधरेविषयीं त्याच्याजवळ विनंति कर.

**भागि०**—( तीं रत्नें व जवाहीर पाहून साश्चर्य. )

पद.—( खरमावो फरमावो० ) ही चाल.

**तव पाहुनि हा हट्ट बालका जातें नृपसदनीं ॥**

वालका जा० ॥ दुर्दैवें जरि कार्य न झालें खेद न तूं मानीं ॥ मुलारे खे० ॥

चंद्रकां०—

प्रियमाते ॥ शंकेतें ॥ सोडुनि दे ॥ भूपतो हीं रत्नें पाहुनी होईल चकित मनीं ॥ खरो-खर हो० ॥ १ ॥

भागि०—

परि बाळा तूं हीन कुळामध्यें जन्मलासि ह्मणुनी ॥
तो नृपति ॥ निज तनया ॥ तुज द्याया ॥
बहु कुतर्क काढुनी धिक्कारिल हें आणीं तव ध्यानीं ॥
मुलारे आ० ॥

चं०कां०—

हें काय वदसि आई ॥ कां शंका तव मनिं अशि ही ॥ तूं त्वरित जाईं इथुनी ॥ १ ॥

[ पडदा पडतो. ]

---

## अंक ४ था.

### प्रवेश १ ला.

( शूरसेन राजा सर्वदरबारी लोकांसह सिंहासनावर बसला आहे असा पडदा उघडतो.)

स०द०लो०—

पद.—( मंगलमय गणराज० ) ही चाल.

गोद्विज धर्म जगांत ॥ करिसी रक्षण तूं दिनरात ॥ धृ० ॥
सकल प्रबल खल शत्रुसीं ॥ निजबल अतुलचि दाख-

**विसी ॥ विजय असो जगतांत तुझा ॥ दूर ती जनापदा ॥ १ ॥ समुद्रवलयांकित कीर्ती ॥ तत्सम चिरसुखसंपत्ती ॥ करो प्रजा तुजवरि प्रीति शांति । वसो नित्य तव राज्यांत ॥ गोद्विज० ॥ १ ॥**

( सर्व आपआपल्या जागीं बसतात. )

शू०रा०—( प्रधानास ) अहो हिरामण.

पद.—( आणा उंची पैठणी० ) ही चाल.

**ज्याची तनया उपवर त्याला चिंता दिनरजनीं ॥ जाळितसे जरी सर्व सौख्यही अनुकूलचि असुनी ॥ ॥ धृ० ॥ कुमार तुमचा असे परी तो कुरुप बहुत ह्मणुनी ॥ मम कन्येला योग्य न वाटे न धरा रोष मनीं ॥ १ ॥**

हि०प्र०—महाराज, यांत रोष धरण्याचें काय कारण? आपलें ह्मणणें कांहींच वावगें नाहीं.

**द्वारपाल**–( मुजरा करून ) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, कोणी एक बाई आपल्या भेटीची इच्छा धरून दरवाज्याबाहेर उभी आहे आणि तिनेंच हीं नजराणा ह्मणून रत्नें दिलीं आहेत.

शू०रा०—(रत्नें पाहून) अहाहा! हिरामण, असलीं अमूल्य रत्नें ज्याच्या संग्रहास आहेत तो किती ह्मणून भाग्यवान् समजलें पाहिजे. अधिक तर काय, पण एखाद्या सार्वभौम राजाजवळही सांपडणें कठीण. (द्वारपालास) द्वारपाल, जा त्या बाईला सन्मानपूर्वक इकडे घेऊन ये. ( तो जातो व तिला घेऊन आल्यावर ) बाई, आपण कोण अहांत: राहतां कुठें व आपला येण्याचा उद्देश काय?

भागि०—महाराज, मी याच आपल्या शहरांत राहणारी शिष्याची स्त्री आहें. उद्देश ह्मणाल तर.

पद.—( भूपती खरे ते० ) ही चाल.

ही दीन दासि पदीं लीन असे नृपनाथा ॥
क्षोभवुं नका तुह्मी वृत्त ऐकुनी चित्ता ॥ धृ० ॥
मम पुत्रानें ती बघुनि आपुली दुहिता ॥
घेतला असे बहु ध्यास जडवुनी चित्ता ॥
निशिदिनीं झुरतसे तो कीं ॥ त्यामुळें ॥
व्यवसाय दिला सोडोनी ॥ त्यामुळें ॥
नच रुचे अन्न पाणीही ॥ त्यामुळें ॥
नृपवरा कुमारा दान मागण्या आलें ॥ द्या
स्नुषा करुनि निजसुता पदीं मी नतलें ॥ १ ॥

शू०रा०—असो, पुढील हकीगत मी समजलों. तुमच्या मलाचें नांव काय व तो हल्लीं आहे कुठें ?

भागि०—महाराज, तो घरीं आहे.

शू०रा०—त्याला इकडे तर घेऊन या.

भागि०—ठीक आहे ( जाते. )

शू०रा०—कोण आहे रे तिकडे द्वारपाल.

द्वारपा०—आज्ञा सरकार.

शू०रा०—जा, वसुंधरेच्या महालांत जाऊन तिला इकाडे घेऊन ये. [ तो जातो ]

चंद्रकां०—( प्रवेश करून. )

पद—.( इन्की मोबत प्यार० )

अगणित जन धन दान करुनी असती सुखी राखिले॥
दावोनी आपुला पराक्रम बहु शत्रु लया लाविले ॥

न्यायाचा जणु दीप भूपतिगमे प्रत्यक्ष धर्ममूर्ती ॥ शांतीसौख्यहि भोगुनी सदा जन कीर्ति बहु वर्णिती ॥ ॥ चाल ॥ पदीं लीन हा दीन दास मनीं, आस अन्य नच कांहीं ॥ आस अन्य० ॥ द्यावा आश्रय मज या पाईं ॥ प० ॥ १ ॥

द्वारपा०—[ वसुंधरेसह प्रवेश करून ] बाईसाहेब,चला अशा इकडे पुढें. ते पहा महाराज बसले आहेत.

वसुंध०—( स्वगत. )

पद.—( कमलनयन कमल० )

सकल जनन विफल ह्मणुनि विकल होय हा काय ॥ न सुचे कांहिं उपाय ॥ हाय ॥ न रुचे जीवन हाय ॥ ॥ हाय ॥ विकल होय हा काय ॥ हाय ॥ हाय ॥ ॥ हाय ॥ हाय ॥ धृ० ॥ सार्वभौमनृपतनया प्रिय मी तळमळतें हि अशी ॥ अहा विधात्या निर्मुनी कां रे दुःखांत लोटिशी ॥ न सुचे कांहीं उपाय ॥हाय ॥ ॥ न रुचे० ॥ १ ॥

शू०रा०—( खालीं उतरून चंद्रकांतास हातांत धरतो व वसुंधरेजवळ जाऊन. )

पद.—( रमा करी मम मनीं० ) ही चाल.

पहा पहा मम प्रियदुहिते ॥ पति हा तुजला शोभतसे गे ॥ धाडियला जणुं भगवंतें ॥ धृ० ॥ नृपसुत आजवरी प्रियतनये तूं ॥ पाहिले किती ॥ त्यांजहुनी ॥ हा रूपगुणी ॥ बहु श्रेष्ठ जनीं ॥ मदनचि

दुसरा ॥ भासे यास्तव ॥ यास वरीं तूं गुणवंते ॥
॥ पहा० ॥ १ ॥

वसुंध०—( त्याकडे पाहून आनंदानें सखीस. ) गडे, हाच तो.

पद.—( किती प्रीती तरि नाटकीं० ) ही चाल.

नर मन्मनमोहन हाच खरा ॥ हाच खरा गडे
हाच० ॥ धृ० ॥ संग घडो या मनहरणाचा ॥
ईशकरो मम पुरा ॥ नर० ॥ तनु जळते ही
दर्शनयोगें ॥ काय करूं न च धीर जरा ॥ न० ॥१॥

चतु०—बाईसाहेब, आपण आतां अशा उतावळ्या होऊं नका, ईश्वरानें तुमचे हेतु पूर्ण करण्याची वेळ अगदीं जवळ आणली आहे. ( राजास ) महाराज, या आपल्या प्रियकन्येचें बरें वाईट करणारे आपणच अहांत. मग तुह्मी केलेली गोष्ट तिला अमान्य कशी बरें होईल ?

शृं०रा०—अहाहा ! धन्य झालों मी आज या जगांत! ( चंद्रकांताचा हात वसुंधरेच्या हातांत देऊन. )

साकी.

पुत्र नसे मज यास्तव तुजला कन्या ही अर्पोनी ॥
मम राज्याचा स्वामि तुला मी केला आज ह्मणूनी ॥
तुह्मी उभयतांनीं ॥ मिळवा सत्कीर्ति भुवनीं ॥ १ ॥

चं०कां०—(वसुंधरेचा हात धरून.)

साकी.

आजपासुनी राजसुता ही मद्भार्या समजोनी ॥
आनंदानें इजसह आतां राहिन मी या भुवनीं ॥
चिंता मम सरली ॥ खरोखर माझी या वेळीं ॥ २ ॥

( चतुरिका पुष्पहारादि सर्व आणते. चंद्रकांताच्या गळ्यांत वसुंधरेनें हार घातल्याबरोबर राजा त्यांना आपल्या शेजारीं आसनावर बसवितो व पऱ्यांचा नाच सुरु होतो.)

पऱ्या०—( गातात व नाचतात. )

पद.—( कालिबादर्यानें० ) ही चाल.

**वंदी नृपरायाच्या पायां दीन दासी आधीं ॥वंदी०॥ ईशा देई जगीं या ॥ भूपातें ॥ सौख्यातें ॥ सकल सफल ॥ करिं हेतु मनिंचे ॥ वधुवरां या त्यापरी ॥ ठेवीं सुखी तूं मुरारी ॥ विनंती ही देवराया तुझ्या पाशीं ॥ वं० ॥ १ ॥**

---

## प्रवेश २ रा ( रस्ता. )

---

**रामभट**०—(प्रवेश करून कृष्णंभटास पाहतांच ) नमस्कार हो कृष्णंभट नमस्कार. आज तर बुवा तुमची फारच धांदल उडाली आहे.

**कृष्णंभट**०—( उभा राहून ) धांदल कशाची, चाललेंच आहे. असे दिवस वारंवार येतात का रामभट ?

**रा०भ**०—असो, पण कृष्णंभटजी, हा राज्याभिषेकोत्सवाचा अद्वितीय समारंभ अवलोकन करून मला तर बुवा पुराणांतील रामराजाच्या राज्याभिषेकोत्सवाच्या वर्णनाचें स्मरण होत आहे. अहो हें शहर तर केवळ अयोध्या नगरीच बनली आहे ! गुढ्या, तोरणें, पताकादिकांनीं सर्व शहर शृंगारून सोडलें आहे ! सर्वसेना, मानकरी, अधिकारी, याज्ञिक, शास्त्री, पंडित, तुमच्या आमच्यासारखे भिक्षुक

मंडळी वगैरे सर्व प्रकारचे लोक आपल्या लवाजम्यानिशीं येथें आले आहेत. जिकडे तिकडे मंगलवाद्यांच्या घोषांनीं सर्व शहर दुमदुमून गेलें आहे.

कृ०भ०—अहो रामभट, अशा महोत्सवाच्या गोष्टी वारंवार का होत असतात? ह्या सर्व पूर्वपुण्याईच्या गोष्टी आहेत. विश्वनाथ शिंपी तो काय, आणि त्याचा मुलगा चंद्रकांत अशा योग्यतेस चढेल व अशा थाटानें त्यास राज्याभिषेक होईल असें कोणास तरी वाटलें होतें का? ( इतक्यांत राज्याभिषेक झाल्याचीं मंगलवाद्यें वाजतात तीं ऐकून) अँ; राज्याभिषेक झाला वाटतें!

रा०भ०—( ऐकून ) अरे हो! गप्पाष्टकांत येथें गुंतलों नसतों, तर आपल्या दृष्टीस पडला नसता का तो समारंभ.

कृ०भ०—असो चला आतां, बोलून काय उपयोगीं?

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा. ( महाल. )

( वसुंधरा आपल्या महालांत आसनस्थ बसली आहे असा पडदा उघडतो. )

वसुंध०—

पद—( भूपती खरे ते ) ही चाल.

त्या जगदीशाच्या पूर्ण कृपेनें मजला ॥ मनरमणाचा सहवास सखे हा घडला ॥ धृ०॥ दुःखांत आजवरि काळ जरी मम गेला ॥ परि सौख्यरवी बघ आतां उदया आला ॥ चाल ॥ उभयतां राहुं आनंदें ॥ या

जनीं ॥ वसतसे आस ही माझ्या ॥ या मनीं ॥ ती पूर्ण करींरे भगवंता जगपाला ॥ करिं धन्य मला सुखरूप राखुनी पतिला ॥ त्या जग० ॥ १ ॥

चतुरि०—( पाहिलेंसें करून ) बाईसाहेब, ते पहा महाराज आलेच.

चं०कां०—( शिकारी वेषानें प्रवेश करून. )

पद–( वंजारा ) ही चाल.

मज गमे पूर्वजन्मीं मी ॥ पुण्याइ केलि बहु नामी ॥ त्यामुळें खचित या जन्मीं ॥ सौख्याचा बनलों स्वामी ॥धृ०॥ त्यापरि ही सुमुखी सुगुणी ॥ लाभली मला मनरमणी ॥ मधुवचें रमवि मज ह्मणुनी ॥ निशिदिनीं इचा सहवास ॥ घडोनी खास ॥ सुखाचे धामीं नेवो ही आस करीं मी ॥ १ ॥

चतुरि०—( वसुंधरेस ) बाईसाहेब, स्वारीची शिकारीला जाण्याची तयारी आहे वाटतें.

वसु०—( लडिवाळपणानें ) प्राणनाथ झालीच का शिकारीची तयारी ?

चंद्रकां०—हो तर तुला पूर्वीच कळविलें होतें ना ?

वसुं०—हो पण मीही बरोबर आलें ह्मणून काय झालें?

पद०–( सबीहमजहालमे० ) ही चाल.

तुह्मांविण कंठुं कशी दिनरात प्रिया मज न्याहो निजसंगें ॥ धृ० ॥ तन मन धन या चरणीं वाहिलें अन्य न मजशीं त्राण ॥ विरहानल तनु जाळिल माझी जातिल निघुनी प्राण ॥ तुह्मां० ॥ १ ॥

चंद्रकां०—प्रिये, तूं कांहीं काळजी करूं नको. मी लौकरच परत येईन. परंतु माझ्या झालेल्या निश्चयाला अडथळा करूं नको, कां जाऊं ना ?

वसुं०—प्राणनाथ,

पद—( दिलदारीकीनिरे० ) ही चाल.

ऐकाहो प्रियकरा ॥ विनती माझी ॥ त्यजुनी ॥ तुह्मी कां विपिनीं ॥ जातां स्वामी न्या संगें आपुली ही सुंदरा ॥ ऐका० ॥ घोर काननीं जिवास तुमच्या कोण जपे हो ॥ कथा दासिला ॥ करितां, नाथा आतां, न्या संगें, आपुली ही सुंदरा ॥ १ ॥

चंद्रकां०—( तिच्या हनुवटीस हात लावून ) प्रिये ! तूं शहाणी आहेस, तुला ज्यास्त सांगितलें पाहिजे असें नाहीं. तिकडे शिकारी लोक तयारी करून माझी वाट पाहत असतील. मला लौकर गेलें पाहिजे.

वसुंध०—मी आपल्याला अडथळा करीत नाहीं परंतु—

चंद्रकां०तो "परंतु" आतां मध्यें नको. मात्र—एक साखरेचा. ( चुंबन घेऊन जातो. )

जादूगार—( कांहीं कंदील हातांत आहेत असा प्रवेश करून. )

पद०—( इनकी मोबत० ) ही चाल,

नूतन हे बहु छान कंदिल कुणी घ्या हो तुह्मो पाहुनी॥ मजला द्या अति जीर्ण जे असति ते शंका न आणा मनीं ॥ चाल ॥ त्वरा करा तुह्मीं वेळ हि ऐशी ॥ दवडुं नका हो वायां ॥ दवडुं ० ॥ घ्या, या, कंदिल हे समयीं या ॥ १ ॥

वसुंध०—सखे, हा ग कोण रस्त्यानें फिरत आहे?

चतुरी०—ताईसाहेब, तो कोणी, नवे कंदील घ्या आणि जुने द्या असें ह्मणत फिरत आहे.

वसुं०—अग पण त्याच्याजवळ चांगले नवे कंदील आहेत तरी ?

चतुरि०—हो तर त्याच्या हातांत अगदीं नवे सुरेख कंदील आहेत.

वसुं०—तर मग आपल्या घरांत एक जुना कंदील आहे तो देऊन नवा घेऊं या.

चतुरि०—आपली इच्छा असेल तर घ्या. पण कांहीं कपट अगर दगा तर नसेल ना ?

वसुं०—अँः त्याला तूं घेऊन तर ये. ( चतुरिका जाते व जादूगारासह परत येते. )

जादू०—( नूतन हे बहु छान कंदील ) हें पूर्वोक्त ह्मणत येतो.

वसुं०—( त्याला पाहून ) अरे बाबा तुझा कंदील तर पाहुं दे कसा आहे तो.

जादू०—आज्ञा बाईसाहेब. हा बघा अगदीं कसा नवीन आहे.

वसुं०—( कंदील हातांत घेऊन. )

पद०—( सांगुं मी किती कठोर० ) ही चाल.

**हा कसारे उलटा धंदा ॥ धृ० ॥ नूतन देउनी जीर्ण मागसी ॥ काय ह्मणूं तुज वद मतिमंदा ॥ काय० ॥ मौल्यवान नग देउनि घेसी ॥ अमोल कां या करिसी छंदा ॥ १ ॥**

जादू०—बाईसाहेब, असें नाहीं. मी एक नवीन व्यापारी असून जे हे नूतन कंदील तयार केले आहेत त्यांचा प्रभाव तुमच्यासारख्यांना समजावा ह्मणून मुद्दाम प्रसिद्ध होण्याकरितां देत आहें.

वसुं०—चतुरिके,जा ग तो आपला कंदील घेऊन ये (ती जाते व कंदील आणून देते.)तो घेऊन जादूगारास हा घेरे कंदील ( देते. )

जादू०—ठीक आहे बाईसाहेब, ( तो घेऊन बाजूस )

पद०—( रिपुगर्वाची पर्वा० ) ही चाल.

**धन्य धन्य मी याच जगांतरीं ॥ अवधि माझी इच्छा पुरली ॥ धृ० ॥ धरा नेउनि स्वर्गीं स्वर्ग ही ॥ हं, हं ह्मणतां आणिन भूतलीं ॥ हं ॥ चल चल भुता सत्वर आतां ॥ प्रगट होईं रे तूं या वेळीं ॥ प्र० ॥ उचलुनि सत्वर महाल येथुनी ॥ घेउनी चल रे निर्जनशा स्थळीं॥**

( कंदील जमीनीवर घांसतांच एक विक्राळ पुरुष प्रगट होऊन वसुंधरेसह महाल उडवून घेऊन जातो.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था. ( जंगल )

( शिकारी लोकांसह चंद्रकांत प्रवेश करतो.)

१ला०—अरे ते पहा मृग. धांवा, धांवा, पहातां काय ?

चं०कां०—( प्रवेश करून. )

पद—( वेषाचें सार्थक किती० ) ही चाल.

**चला घरीं पुरे करा रे आपुली शिकार ॥ जगतां तुह्मी जन्मुनियां व्यर्थ कुलांगार ॥ धृ० ॥ शिकार**

कशी मिळेल तुह्मां नाहीं हा सुमार ॥ धरुनि मनीं हिंडतसां भितारे अपार ॥ १ ॥

इतक्यांत मुका धावऱ्या धावऱ्या धांवत येतो व खुणेनें वसुंधरेसह महाल जादूगारानें उडवून नेला असें सांगतो.)

चं०कां०—( तें समजून अति दुःखानें. )

पद.—( आज शाम मोहि० ) ही चाल.

हाय हाय काय गती जाहली असे तरी ॥ वसुंधरा प्राणसखी पाहुं कुठे जगांतरीं ॥ धृ० ॥ कंदिलादि महाल नष्ट जाहला असे जरी ॥ खेद तयाचा न मुळीं सत्य सत्य अंतरीं ॥ १ ॥

( मुका हातांत असलेली आंगठी जमिनीवर घांसण्याची खूण करतो. )

चं०कां—( समजून ) धन्य धन्य; तूं एक मला पूर्व पुण्याईनेंच मित्र मिळाला आहेस. ( आंगठी घांसतो तोंच एक विक्राळ पुरुष प्रगट होतो. )

वि०पु०–"मान्य मान्य मान्य मला" हें पूर्वोक्त ह्मणतो.

चं० कां०—

पद०—( सदये अंचे० ) ही चाल.

सत्वर आतां चल रे भूता ॥ जेथें आहे मत्प्रिय-कांता ॥ नेवुनि तेथें तूं मजला ॥ दाखविं माझ्या सुंदरिला ॥ धृ० ॥ १ ॥

भूतः—बहु अवघड तें स्थळ आहे ॥ त्या ठायीं तो जादूवाला ॥ रात्रंदिन वसुनी राहे ॥ तेथ न जावे कवणाला ॥

चं०कां०—कां हें वदसी ॥ पिशाच असती ॥ भीसी कां रे तूं त्याला ॥ तें स्थल आणि त्या रिपुला ॥ दावुनी धरिं तूं पथ आपुला ॥

भूत—मम स्कंधावरि ॥ बैसा सत्वरिं ॥ नेतों त्या स्थलीं तुह्मांला ॥ १ ॥

[ भूत खाद्यांवर घेत आहे इतक्यांत पडदा पडतो. ]

---

# अंक ५ वा.

स्थल—निर्जन प्रदेशांत जादूगारानें उडवून आणलेला वसुंधरेचा महाल.

वसुंध०—( आसनस्थ दुःखातिशयानें. )

पद.—( साहुं कसें दुःख० ) या चालीवर.

महजब तरी हा जाहला ॥ बाईगे, या परी ॥ तारीं तूं श्रीहरी ॥ श्रीहरी ॥ श्रीहरी ॥ अधमानें त्या घातचि केला ॥ कंदिल तो हरुनी ॥ महालासह मज घोर स्थलीं या ॥ एकाएकीं आणुनी ॥ गहजब० ॥

जादू०—( प्रवेश करून ) सुंदरी, बोल बोल तुझी काय इच्छा आहे ? स्वपराक्रमाच्या बळानें स्वर्गाची अप्सरासुद्धां आणून तुझी दासी करीन.

पद—( या मंत्रसिद्धीचा० ) ही चाल.

शृंगारयुक्त ही बघुनि नार मी चित्तीं ॥ बहु शांत जाहलों नच राही शुद्धि ती स्मरशरें प्राण तळतळती ॥

इजसीं संग करिं ह्मणतो ॥ जैसी शोभे ॥ पुष्पें ॥ लतिका जणूं ॥ शृंगार० ॥ १ ॥

वसुं०--बाबारे, हे तुझे विचार सर्व निष्फल आहेत. मी तुला एकवेळ सोडून शंभरवेळां सांगितलें आहे कीं, तूं माझ्या नादीं लागूं नको. या कामांत तुला मुळींच यश यावयाचें नाहीं.

जादू०--( लंपटपणानें )

पद—( रुसनातें कां करिशी० ) ही चाल.

मैना तूं सखये मी सुंदर सुबक छान राघू ॥
आलिंगन चुंबनासि दे दे अवघीं सौख्यें भोगूं ॥
रम्य शयनीं ॥ रंग लुटुनी ॥ करूं चैनी ॥ मी भाग्यवान या जगांत सखये किती ह्मणुनि सांगूं ॥ १ ॥

( वसुंधरेचें चुंबन घ्यायला जातो. )

वसुंध०--( त्याला झिटकारून. )

पद—( पापि दूर पापि दूर० ) ही चाल.

मूर्खा दूर मूर्खा दूर मूर्खा दूर रे ॥ मूर्खा दूर रे ॥
इष्ट नाहीं हें जाण ध्यानीं आण विनती मान ॥ मू० ॥ धृ० ॥

जादू०—

मदन उरीं मारि सुरी शांत करीं सुंदरी ॥ हृदयिं धरी अधरपान देइं सखे सत्वरी ॥ मान मान मान मान मान मान ॥

वसुं०—मूर्खा दूर मूर्खा दूर० ॥ हा न बरा छंद नरा ऐक जरा सुबोध रे ॥

जादू०—विदित असे सकल मला पूर्ण करीं हेतुला॥ मान मान मान मान मान मान ॥

वसुं०—मूर्खा दूर० ॥ १ ॥

जादू०—काय, मला तूं वश होत नाहींस काय ?

वसुं०—( त्वेषानें )

पद—( राम करी जरी नृप० ) ही चाल.

प्राण जरी हे निघुनी जाती ॥ तरि न होइ तुज माझी प्राप्ती ॥ कुजना कां मग आणिशि चित्तीं ॥ दुष्ट अशी इच्छा ॥ कपटानें मज आणुनि येथें ॥ भीति दावुनी वश करण्यातें ॥ बघशी अधमा परि तुज वदतें ॥ निष्फळ कीं सारें ॥ व्यर्थ पडुनि तूं माझ्या नादा ॥ शिणविशि तनु कां रे ॥ मतिमंदा ॥ सोडुनि दे या भलत्या छंदा ॥ सांगु किति मूर्खा ॥ १ ॥

जादू०—

पद.—( माळिन नव तरुणी० ) ही चाल.

प्रीति सखे जडली ॥ किं मजवरि ॥ प्रीति सखे० ॥ ही सुबक छान तव मूर्ति गोजिरी मन्मनीं बहु भरली॥ ॥ धृ० ॥ मम नयना दिससी सखे किती तूं सुंदर ॥ दे अधरपान ह्मणुनियां अतां तूं सत्वर ॥ मज समान दुसरा नसे कोणि ही महिवर ॥ मनुज भाग्यशाली कीं महिवर मनुज० ॥ हें ध्यानिं आणुनी कामेच्छा करीं पूर्ण अशा वेळीं ॥ १ ॥

( तिला आलिंगन द्यायला जातो. )

वसुं०—( त्याला दटावून. )

पद—( परि शिवा न लावीं हात० ) ही चाल.

हां करीं न मूर्खा स्पर्श मला ॥ चल सरक, सरक हो दूर बैला ॥ धृ० ॥ परस्त्रियेचा छंद नच बरा ॥

जादूगा०—

सांगुं नको हें चूप् ॥

वसुं०—

मूर्खा स्पर्श मला ॥ हां करीं न मूर्खा० ॥

जादू०—

" शर "

रतीतुल्य हें तव रूप पाहोनि नयनीं ॥
मना ध्यास गे राहिलासे जडोनी ॥
रतिसंगरंगीं करीं दंग मातें ॥
त्वरें पाज दासासि त्वद्धरामृतातें ॥

वसुं०—

हंसी मी तूं वायस अधमा ॥

जादू०—

जीभ नको करूं लांब ॥

वसुं०—

मूर्खा स्पर्श मला ॥ हां करीं न मूर्खा० ॥

जादू०—

"शर"

नको अंत पाहूं सखे क्षेम देई ॥
असे दास हा लीन तव याच पाई ॥
प्राणांतिहीं मी न सोडीन हेतू ॥
त्यजोनि हा हट्ट तुष्टविं या त्वरें तूं ॥

वसुं०—
ऐसें बोलूनि नरकीं जाशी ॥

जादू०—
पर्वा नच मज जाण ॥

वसुं०—
मूर्खा० ॥ हां करीं न मूर्खा० ॥ १ ॥

जादू०—सुंदरी, जों जों तूं आपली कोपिष्ठ मुद्रा करीत आहेस तों तों ती पाहून मी देहभानरहित होत आहें. आतां अंत न पाहतां लौकर संतुष्ट कर, अशी तुझ्या पायांजवळ मी विनंति करतों.

वसुं०—पद०—( ब्यांडची० )ही चाल.

सांगुं किती तरी तुजसिं अधमा कृष्णवदन करिं झडकरी तूं ॥ या तव चरणीं मस्तक फोडुनि देइन प्राणा हा हेतू ॥ तुज सम दुसरा मानव कोणी ॥ नीच नसे रे या भुवनीं ॥ मतिभ्रष्टा ॥ पापिष्ठा ॥ अति नष्टा ॥ जा दुष्टा ॥ सांगुं० ॥ १ ॥

जादू०—

पद०– ( ऐ सरवर रवतर० ) ही चाल

घे रतिसुख सुंदरी, कुठवरि, यापरि, श्रमविशि तूं तनुशीं
या जिवास ॥ व्यर्थ त्रास ॥ देशि खास ॥

वसुं०—

प्राणांतींहि तुला ॥ माझी प्रीती खला न होई रे मला॥
छळिशि किती आला ॥ त्रास बहु तुज बोलुनी ॥

जादू०—

दुःसह मन्मथ शांत करीं ॥ मजविषयीं मनिं प्रेम धरीं ॥

वसुं०—

पातकि तूं अससि दुष्ट ॥ कां हे व्यर्थ घेसि कष्ट ॥

जार—

घेई, प्रेमें, तूं, गे, आतां पदरिं दीन दास तुजसि ॥
शरण हा पहा तरी ॥ घे रतीसुख० ॥

वसुं०—अरे नीचा याच्याहीपेक्षां तूं मला किती जरी छळिलेंस तरी मी तुझ्या,ह्मणण्याप्रमाणें वागेन असें मनांत सुद्धां आणुं नको.

जादू०—ठीक आहे. (स्वगत) हो आतां असेंच केलें पाहिजे. उत्तम असें मद्य आणून तें हिला प्राशन करण्यास दिलें, कीं तेव्हांच रंगांत येऊन माझ्या इच्छेप्रमाणें वागेल.

( मद्य आणण्यास जातो )

वसुं०-(गेलासें पाहून) गेला का मेला;हाय हाय ! आतां हा मद्य प्राशन करून आला ह्मणजे माझी काय दशा करील.

पद–( गुलबाग चमनमें० ) ही चाल,

नाहीं त्राण मदीय प्राण जाऊं पाहती ॥
नाथविरह जाळि तनू साहुं मी किती॥धृ०॥

मूर्खपणें कंदिल तो विकुन टाकिला ॥
ह्मणुनि दुःखडोह असा प्राप्त जाहला ॥
धांव, पाव, त्वरित हरी दावि प्रियपती ॥ १ ॥

(इतक्यांत चंद्रकांत व मुका भुतासह यतात व भूत वसुंधरेस दाखवून जातें )

चं०कां०–( वसुंधरेजवळ जाऊन )

पद—( यहबदो मे पाया गम० ) ही चाल.

तव विरहानें मत्प्राण ॥ झाले हैराण ॥
दे आलिंगन मज घट्ट ॥ करीं संतुष्ट प्रिये तूं जाण ॥

वसुं०—( सप्रेम )

मद्भाग्य थोर ह्मणुनी हे ॥ प्रियकरा चरण मी पाहें ॥

चं०कां०–( आलिंगून )

अहा दिसव किती हा छान ॥ जाहलों धन्य ॥ दे० ॥

मत्प्राणदयिते,तुझा त्या अधमानें फारच छळ केला असेलना!

वसुं०-प्राणनाथ, त्याचें वर्णन सुद्धां करवणार नाहीं तथापि आपले पाय दृष्टीस पडल्याबरोबर सर्व दुःख नाहींसें झालें. बरें पण तो दुष्ट आतां मद्य घेऊन लौकरच इथें येईल. पुढें ?

मुका०–( आपल्याजवळची एक पुडी चंद्रकांतास देऊन खुणेनें ती त्याला पाजावयास सांगतो. )

चं०कां०–( पुडी घेऊन ) हो ! तो आतां मद्य घेऊन आला ह्मणजे तूं ही पुडी दारवेंतून त्याला पाज;ह्मणजे तो गुंग झाल्याबरोबर आह्मी त्याला ठार मारून टाकतों. भिऊं नको आह्मी इथेंच आड लपून राहतों. ( मुक्यासह लपन राहतो )

जादू०-( हातांत दारूची बाटली व ग्लास घेऊन प्रवेश करतो ) सुंदरी असली दारू तुला तुझ्या सगळ्या जन्मांत सुद्धां प्यायला मिळाली नसेल. घे. ( ग्लास भरून देतो )

वसुं०-( तें घेऊन ) ठीक आहे तर, आज आपण दोघांनीही यथेच्छ प्यायची; पण पहिल्यानें तुह्मीं प्याली पाहिजे ( तें त्याला देते. )

जादू०-( तें घेऊन ) अहाहा ! फक्त दारूची बाटली बघितल्याबरोबर किती रंगांत आली. वाहवा ! आज ही दारू या सुंदरीला गुंग करून खचित खचित मला रतिसंगांत दंग करणार. ( पितो. )

वसुं०-( बाटली व ग्लास आपल्या हातांत घेते व ग्लासांत पुडी घालून पुन्हां दारू ओतून त्यालाच देते ) हं तसेंच हें येवढं ग्लास तुह्मीं घेतलेंच पाहिजे.

जादू०-(निशेंत आल्यासारखें करून)सुंदरी,तुझ्या हातची कोण नको ह्मणणार आहे? आण.(ती पितो व गुंग होऊन) सुंदरी, आणखी दे.(आणखी ग्लास भरून देते तें हातांत घेऊन)

पद.—( छोरीबामनकी० ) ही चाल.

**उडवूं आजी रंग ॥ सखये ॥ उडवूं आजी० ॥**
**रंगामध्यें दंग होउनी यथेच्छ करूं रतिसंग ॥ सख०॥**
**॥धृ०॥मदनाचा मी पुतळा केवळ रतीच कीं तूं जाण॥**
**आलिंगन चुंबनासि देउनी करिं आतां मत्त्राण ॥ १॥**

( बेशुद्ध होऊन तिच्या अंगावर जात असतां खालीं पडतो; इतक्यांत मुका व चंद्रकांत धांवत येऊन त्याला खंजीर खुपसून ठार मारतात. )

वसुं०—( चंद्रकांतास आलिंगून )

पद.—( रतिविलास गंगे० ) ही चाल.

मज प्रिया मुक्त करण्याला ॥ श्रम पडले बहुत तुह्मांला॥

चं०कां०—

आजि गेले क्लेश लयाला ॥ मुळिं दुःखलेश नच उरला ॥
तव पाहुनि मुखकमलाला ॥ मनिं मोद अनावर झाला॥
यापुढें कधीं जगपाला॥सखिविरह घडो नच मजला॥१॥

( मुका कंदील आणून चंद्रकांतास देतो व तो घांसण्यास सुचवितो. )

चंद्रकांत—( कंदील हातांत घेऊन ) अहाहा!

पद—( मला शांत मुनि भासतो० ) ही चाल.

खरा मीच या जगतिं भाग्यशाली ॥
सकल इच्छा खचित आज पुरली ॥ खरा०॥धृ०॥
धरा ही नेउनी स्वर्गि तो स्वर्ग ही ॥
क्षणार्धांत आणीन भूमिभागीं ॥
प्रबल शत्रूप्रती लाविला यमपथीं ॥
नाहिं भीति अतां मजसिं उरली ॥ खरा० ॥

( कंदील जमिनीवर घांसतो तोंच दूत प्रगट होतो. )

दूत०—( हात जोडून ) महाराज काय आज्ञा आहे.

चंद्रकां०—आह्मां सर्वांसह हा महाल माझ्या शहरांत पूर्वस्थलीं नेऊन ठेव.

दूत०—ठीक आहे. हुकुमाप्रमाणें करतों. ( महालाला हात लावतांच सर्वांसह महाल उडून जातो) ( पडदा पडतो.)

## प्रवेश २ रा. [ स्थळ—रस्ता. ]

( राजा व प्रधान बोलत बोलत प्रवेश करतात. )

**राजा**--अहो पण अद्यापपर्यंत अकस्मात महाल उडून गेला, असें मीं कुठेंच पाहिलें नाहीं व ऐकलेंही नाहीं.

**प्रधा०**--महाराज, आतां आपल्याला पश्चात्ताप होत असेल. परंतु पूर्वीं आपण कांहींच विचार केलात नाहीं. अहो विश्वनाथ शिंपी तो काय आणि त्याच्या यःकश्चित् मुलाला आपली कन्या अर्पण करणें ह्मणजे किती अविचाराची गोष्ट आहे. तरी मी सांगत होतों कीं, ती.

**राजा**—( रागानें ) बस्स ! बस्स ! पुरे करा, तुह्मांला ज्यास्त बोलण्याची गरज नाहीं. ( स्वगत ) हाय हाय ! आतां तिचा शोध तरी कसा लागावा.

पद.—( राग--मालकौंस—ताल त्रिवट. )

**वसुंधरा मम कन्या सुशीला ॥ वसुंध० ॥ पाहुं कुठें मी आतां तिजला ॥ धृ० ॥ प्राणाधिक ती माझी चिमणी॥ दुःसह संकटीं पडली सुगुणी ॥ तिजवांचुनी मज न सुचे ह्मणुनी॥शून्य गमे जग अवघें मजला ॥वसुं०॥१॥**

( इतक्यांत एक हेर धांवत येतो. )

**हेर**--( हात जोडून ) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, वसुंधरा बाईसाहेबांचा महाल, चंद्रकांतमहाराज व त्यांच्यासह आकाशांतून खालीं उतरत आहे, चला चला लौकर.

**राजा**--अरे कुठें आहे. चल चल दाखीव चल.

( जातात. )

## प्रवेश ३ रा. ( महाल. )

( आकाशांतून महाल उतरत आहे व सर्व लोक तें पहात आहेत असा पडदा उघडतो. महाल उतरल्याबरोबर वसुंधरेसह चंद्रकांत, राजास भेटतो. )

**राजा**–( वसुंधरेस जवळ घेऊन. )बाळे,काय तुझी दशा ही? तुझा महाल अकस्मात कसा उडून गेला? हा प्रकार तरी काय आहे ?

**वसुं०**–बाबा,ज्या कंदिलाच्या साह्यानें महालचसा काय पण हें आपलें सर्व शहर सुद्धां इकडचें तिकडे करतां येईल असा एक कंदील मोठ्या प्रयत्नानें प्राणनाथांनीं मिळविला आहे.तो कंदील एका भयंकर जादूगारानें माझ्या जवळून कपटानें हरण केला आणि त्याच्या प्रभावानें तो माझा महाल घोर व निर्जन वनांत घेऊन गेला होता.

**राजा**—बरें पण पुढें चंद्रकांताची आणि तुझी भेट कुठें व कशी झाली ?

**चं०कां०**—महाराज, त्या दुष्ट जादूगारानें महाल उडवून नेला त्यावेळीं ज्या अरण्यांत मी शिकारीस गेलों होतों,तिथें हा माझा मित्र मुका धांवत आला आणि इकडील सर्व हकीगत खुणेनें समजाविल्यानंतर या आंगठीच्या साह्यानें त्या अरण्यांत जाऊन.

पद.—( राग—मालकौंस—ताल त्रिवट. )

**व्याघ्रमुखांतुनी आणिली सोडुनी ॥ व्याघ्र० ॥**
**हरिणीसम कीं हो मम रमणी ॥ धृ० ॥**
**दुःख, शोक, भय, चिंता, मनिंची ॥**
**सोडुनि द्या तुह्मि आपुल्या साची ॥**
**खोड मोडुनी त्या शत्रूची ॥**
**विजयी झालों मी या भुवनीं ॥ व्याघ्र० ॥ १ ॥**

राजा--( त्याला पोटाशीं धरून ) अहाहा ! बाळा चंद्रकांता, तूं या जगांत धन्य आहेस.

सर्व--( चंद्रकांतास उद्देशून )

पद--( नरमांस खंड० ) ही चाल.

चंद्रकांत भूपवरा समरिं रघुपरी ॥
प्रबल अरी, वधुनि होईं स्थीर महिवरी ॥ धृ० ॥
स्वाभिमान, धर्मशीलता, मनीं धरीं ॥
देशभक्ति, अतुलशक्ति, शांतता, पुरी ॥
शौर्य, धैर्य, विद्या, धन, विनयता वरीं ॥
सुजनभीति झटुनि सदा दूर तूं करीं ॥ १ ॥

## अंक ५ समाप्त.

## पुस्तककर्त्याची ईश्वरास प्रार्थना.

पद--( मदनारि गौरीकांता० ) ही चाल.

रणधीर ॥ रामराया ॥ जानकिमनरमणा ॥ सुखकर दशकंधरकदना ॥ दे भजनीं सुमती ॥ धृ० ॥
प्रभु रूप तुझें ॥ मज, दावुनी ॥ अविनाशि दे पद अंतीं ॥ प्रपंच मजला ॥ निष्फळ गमला ॥ अंत न लागे मायेचा ॥ रचुनि, कवन सुमन हें ॥ चरणकमलीं तव ईशा ॥ अर्पुनि विनती करीतसें ॥ सुप्रिय होवो सकलांला ॥
तारिं तारिं प्रभो ॥ बलवंत किंकरा ॥ अन्य न आसरा ॥ सुखधामा ॥ श्रीरामा ॥ दे प्रेमा ॥ दुरितें तीं ॥ वारिं सारीं ॥ तारिं तारिं प्रभो० ॥ १ ॥

समाप्त.

# विक्रीस तयार.

## धामणस्करकृत संगित नाटकांचीं पुस्तकें.

| नावें. | रु० | आ० | पै० |
|---|---|---|---|
| संगित रत्नावली नाटक. ... | ० | ६ | ० |
| ” कामसेन-रसिका अथवा दुर्बुद्धिपराजय नाटक. ... | ० | ५ | ० |
| ” वीरसेन-मंजरी नाटक ... | ० | ६ | ० |
| ” अल्लाउद्दीन अथवा ... | ० | ६ | ० |
| चंद्रकांत-वसुंधरा नाटक. | ० | ६ | ० |
| ” भुवनसुंदरी अथवा सतिविजय नाटक. ... | ० | ६ | ० |
| ” अजितसिंह-कमला नाटक | ० | ६ | ० |
| ” स्नेहपान नाटक. ... | ० | ६ | ० |
| ” चंद्रसेन-मोहना नाटक. | ० | ६ | ० |

धामणस्करकृत संगीत चंद्रसेन-मोहना नाटक आज बरेच दिवस कांहीं अडचणी मुळें छापविण्याचें राहिलें होतें तें आज छापून विक्रसी तयार आहे. या पुस्तकांत शृंगारादि करुणारस परीपूर्ण भरलेला असून स्त्रिया व पुरुष अविचाराचीं कामें कशीं करितात याचें दिग्दर्शन चांगलेंच केलें आहे तरी सुज्ञ स्त्रिया व पुरुष यांनीं एकवेळ अवश्य वाचून पहावें. हीं पुस्तकें खालील पत्यावर विकत मिळतील.

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक मोतीबाजार मुंबई.

# विक्रीस तयार.

(धामणस्करकृत संगीत नाटकांचीं पुस्तकें)

| नांवें | रु | आ | पै. |
|---|---|---|---|
| संगीत रत्नावली नाटक .... | ० | ६ | ० |
| " कामसेन-रसिका अथवा दुर्बुद्धिपराजय नाटक. | ० | ५ | ० |
| " वीरसेन-मंजरी नाटक | ० | ६ | ० |
| " अल्लाउद्दीन अथवा चंद्रकांत-[illegible] नाटक. | ० | ६ | ० |
| " भुवनसुंदरी अथवा सतीविजय नाटक ... .... | ० | ६ | ० |
| " अजितसिंह-कमला नाटक. | ० | ६ | ० |
| " स्नेहपाल नाटक. .... | ० | ६ | ० |

या शिवाय धामणस्करकृत संगीत चंद्रसेन-मोहना नाटक छापून तयार आहे या पुस्तकांत स्त्रिया व पुरुष अविचारांचीं कामें कशीं करतात याचें दिग्दर्शन चांगलेंच केलें आहे [illegible] सुज्ञ स्त्रिया व पुरुष यांनीं एक वेळ अवश्य वाचून पहावें. हीं पुस्तकें खालील पत्त्यावर विकत मि०

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक,

मोती बाजार-मुंबई.